बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक १६ | बुधवार,दि.२९ मार्च २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# व्याघ्रसंख्येचा आकडा नऊ एप्रिलला उघडणार

**गोंदिया:** भारतातील वाघांची संख्या नेमकी किती याची उत्सुकता सर्वांनाच आहे. दर चार वर्षांनी होणाऱ्या व्याघ्रगणनेचा पेटारा नेहमी २९ जुलैला व्याघ्रदिनाच्या दिवशी उघडला जातो. यावेळी या प्रथेला फाटा देण्यात आला आणि व्याघ्रदिनाला हा पेटारा उघडलाच नाही. मात्र, ही प्रतिक्षा संपली असून येत्या नऊ एप्रिलला व्याघ्रगणनेची आकडेवारी जाहीर होणार आहे. म्हैसूर येथे आंतरराष्ट्रीय व्याघ्र प्ररिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार असून ते व्याघ्रगणनेचा अहवाल प्रसिद्ध करणार आहेत.

विशेष म्हणजे भारताने नुकतेच व्याघ्रप्रकल्पाची पन्नाशी पूर्ण केली आहे. जगभरातील व्याघ्रसंख्येच्या ७० टक्के वाघ भारतात आहेत. वाघांच्या संख्या वाढीचा दर हा वार्षिक सहा टक्के आहे. २००६ ते २०१८ या बारा वर्षाच्या कालावधीत भारताने व्याघ्रसंवर्धनावर पूर्णपणे लक्ष केंद्रीत केल्यामुळे वाघांची संख्या दुप्पट झाली. म्हैसूर येथे नऊ एप्रिलपासून आयोजित तीन दिवसीय परिषदेत व्याघ्रसंवर्धनासाठी अधिक राजकीय आणि सार्वजनिक समर्थन मिळवण्याचे भारताचे प्रयत्न राहतील. याच परिषदेत वाघांचे ५० रुपयाचे नाणे देखील प्रसिद्ध केले जाईल.

दक्षिण आफ्रिकेतून ज्याप्रकारे भारतात चित्ता आणले गेले, त्याचप्रकारे भार-तातून कंबोडियामध्ये वाघांना आणण्याची योजना देखील या परिषदेत जाहीर केली जाऊ शकते. कंबोडीयामध्ये २००९ मध्ये वाघ पूर्णपणे नामशेष झाला होता. त्यानंतर भारत आणि कंबोडियामध्ये वाघाच्या स्थलांतरणाचा एक करार करण्यात आला. त्यानंतर कंबोडियाचे एक शिष्टमंडळ देखील भारतात येऊन गेले. तर भारताचे शिष्टमंडळ देखील कंबोडिया येथे जाऊन आले. कंबोडियातून वाघांच्या बेपत्ता होण्याचे कारण शोधले जाईल. शिकारतळ, शिकारी, गस्त, पायाभूत सुविधा यांची खात्री केल्यानंतरच पुढचे पाऊल उचलले जाईल.

## "गोल्डन ज्युबिली' निमित्त ५० रुपयांचे "टायगर कॉईन'



देशात "प्रोजेक्ट टायगर'च्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने केंद्र सरकारचे अर्थ मंत्रालय "स्मारक नाणे' जारी करणार आहे. ५० वर्षे पूर्ण झाल्यावर ५० रुपयांचे स्मरणाथी नाणे काढले जाईल. या संदर्भात अधिसूचना जारी करताना केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाने सांगितले की, हे नाणे चतुर्थांश धातूचे आणि ४४ मिमीचे गोलाकार असेल. चतुर्थांश मिश्रधातूमध्ये चांदीचा वाटा ५० टक्के, तांबे ४० टक्के, निकेल ५ टक्के आणि जस्त ५ टक्के असेल. दातेरी कडांची संख्या २०० असेल. नाण्याचे वजन ३५ ग्रॅम असेल. त्यावर ङ्गसत्यमेव जयतेफ कोरलेले असेल. त्याच्या डाव्या परिघावर देवनागरी लिपीतील "भारत' हा शब्द असेल आणि उजव्या परिघावर इंग्रजीत "इंडिया' हा शब्द असेल. सिंह स्तंभाखाली रुपयाचे चिन्ह आणि आंतरराष्ट्रीय अंकांमध्ये मूल्य ?५० हे देखील असेल.

नाण्याच्या उलट बाजूच्या मध्यभागी वाघाचे चित्र असेल. चित्रासमोरील नाण्याच्या उजव्या बाजूला १९७३-२०२३ कोरलेले असेल. नाण्यावर हिंदीमध्ये "५० वर्षांचे प्रोजेक्ट टायगर' आणि इंग्रजीमध्ये "५० वर्षांचे प्रोजेक्ट टायगर' असे लिहिलेले असेल. उल्लेखनीय आहे की, १ एप्रिल १९७३ रोजी केंद्र सरकार आणि तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात "प्रोजेक्ट टायगर' सुरू केला होता. सध्या देशात ५३ व्याघ्र प्रकल्प असून वाघांची संख्या सुमारे २५०० आहे. उत्तराखंडच्या जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानाला (तेव्हाचे उत्तर प्रदेश) देशातील पहिला व्याघ्र प्रकल्प होण्याचा मान मिळाला होता. तर महाराष्ट्रात एकूण पाच टायगर प्रोजेक्ट आहे.

## स्वित्झर्लंड येथील आंतरराष्ट्रीय संस्थेचे नवेगांव-नागझीरा या प्रकल्पांला मानांकन

स्वित्झर्लंड येथील "कॅट्स" या अंतराष्ट्रीय संस्थेच्या कार्यसमितीने देशातील सहा व्याघ्र प्रकल्पांना मानांकीत केले आहे. यामध्ये काली, मेळघाट, पिलीभीत, नवेगांव-नागझीरा, पेरीया व ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा समावेश आहे. विशेष म्हणजे देशातील सहा व्याघ्र प्रकल्पांमध्ये विदर्भातील ताडोबा, मेळघाट व नवेगांव-नागझीरा या प्रकल्पांचा समावेश आहे. कॅट्स अंतराष्ट्रीय कार्यकारी समिती, स्वित्झर्लंड यांनी सन २०२२ मध्ये राज्यातील व्याघ्र प्रकल्पाचे विविध स्वरूपातून मुल्याकंन केले होते आणि या सर्व मूल्यांकनमध्ये नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प खरे उतरले आणि एनएनटीआर व्याघ्र प्रकल्पाला "कॅट्स" मानकांने गौरविण्यात आले. कॅट्स या आंतरराष्ट्रीय संस्थेचे कार्यकारी समितीचे अध्यक्ष सुघोतो रॉय यांनी भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयाचे हेमंत सिंग यांना पत्र लिहून ही माहिती दिली आहे.

NNTR
NAWEGAON - NAGZIRA TIGER RESERVE

## बाजार समितींच्या निवडणुकांचा बिगूल वाजला

**गोंदिया :** कोरोनाचा प्रादुर्भाव व न्यायालयीन प्रक्रीयेमुळे जिल्ह्या-तील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका प्रलंबित होत्या. आता या निवडणुकीला मुहूर्त मिळाला आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणनविकास व नियमन कायद्यातील तरतुदीनुसार जिल्ह्यासह राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकीचे वेळापत्रक सोमवार, २७ मार्च रोजी निवडणूक प्राधिकरणाने जाहीर केले. जिल्ह्यातील आमगाव, तिरोडा, दे-वरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव व गोंदिया कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका प्रलंबित होत्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्यानंतर आता सहकार क्षेत्राच्या निवडणुकांचा कार्यक्रम निवडणुक विभागाने जाहीर केला आहे. या अंतर्गत ज्या बाजार समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत आणि त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे, अशा बाजार समित्यांच्या निवडणुका घेण्याचा निर्णय राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने घेतला आहे. त्यानुसा र१ ऑगस्ट २०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीत सुधारणा करून सुधारित मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल किंवा याद्या प्रसिध्द झालेल्या ठिकाणी कृउबासच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.




कृउबास निवडणूक नियम २०१७ मध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा लक्षात घेऊन निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना ही देण्यात आल्या आहेत. या सोबतच निवडणुकीसाठी राज्य सरकार किंवा कृउबास तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पात्र व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेण्याबाबतही मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. कृउबासची निवडणूक जाहीर झाल्या असून २८ व ३० एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे आता राजकीय मोर्चेबांधणीला सुरुवाय झाली आहे.

**असा राहणार निवडणूक कार्यक्रम**

निवडणूक निर्णय अधिकारी सोमवार २७ मार्च रोजी निवडणुक वेळापत्रक जाहीर करतील. या नंतर ३ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. उमेदवारी अर्जांची छाननी ५ एप्रिलला होईल. ६ एप्रिल रोजी छाननी नंतर उमेदवारी अर्जांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. ६ ते २० एप्रिल या कालावधीत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. २१ एप्रिल रोजी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यासोबतच उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येईल. जिल्हा मुख्यालयी असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी २८ एप्रिलला आणि तालुका स्तरावरील बाजार समित्यांसाठी ३० एप्रिलला मतदान होणार आहे. तालुका बाजार समिती निवडणुकीची मतमोजणी ही होणार आहे. तर जिल्हा स्तरीय बाजार समित्यांच्या निवडणुकीचे निकाल मतदानाच्या तारखेपासून ३ दिवसांच्या आत जाहीर केले जातील.

# जिल्ह्यातील ३३ वाळूघाटांचा लिलाव रखडला

**गोंदिया:-** पर्यावरण मंडळाची मंजुरी न मिळल्याने आणि शासनाच्या वाळू घाटांच्या नवीन धोरणामुळे जिल्ह्यातील ३३ वाळू घाटांचे लिलाव रखडले आहेत. परिणामी लिलावाच्या माध्यमातून मिळणा?या महसुलावरसुद्धा यामुळे पाणी फ`रले जात असून वाळू तस्करांना मात्र मोकळे रान मिळत असल्याचे चित्र आहे.जिल्ह्यात लहान मोठे असे एकूण ६५ वाळू घाट आहेत. यापैकी ३३ वाळू घाटांचा लिलाव महसूल विभाग पर्यावरण मंडळाची परवानगी मिळाल्यानंतर करीत असतो. परंतु, यंदा ३३ वाळू घाटांच्या लिलावासाठी मंजुरी मिळाली. पण राज्य शासनाने वाळू घाटासंदर्भात नवीन धोरण तयार केले आहे. हे धोरण नेमके काय आणि कसे असणार याची माहिती सध्या खनिकर्म विभागालाच ठाऊक नाही. जिल्ह्यातील ३३ वाळू घाटांच्या लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाली असताना मागील आठवड्यात जिल्हा खनिकर्म विभागाला शासनाकडून पत्र प्राप्त झाले. त्यानुसार वाळू घाटांच्या लिलावासंदर्भात शासनाचे नवीन धोरण तयार होत असून त्याची अंमलबजावणी झाल्यानंतरच त्यानुसार लिलाव प्रक्रिया राबविण्याच्या सूचना केल्या आहेत. परंतु, मार्च महिना संपत येत असतानासुद्धा नवीन धोरणाची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यामुळे उर्वरित एप्रिल आणि मे महिन्यात वाळू घाटांची पुढील प्रक्रिया कशी राबविणार, असा प्रश्न आहे.वाळू घाटांच्या लिलावाच्या माध्यमातून जिल्हा प्रशासनाला दरवर्षी १७ कोटी रुपयांचा महसूल मिळत असतो. ही प्रक्रिया सुद्धा फेबुवारी महिन्यात राबविली जाते. परंतु, यंदा लिलाव झाले नसल्याने १७ कोटी रुपयांच्या महसुलावर खनिकर्म विभागाला पाणी सोडण्याची वेळ आली आहे.



करोनामुळे आधी दोन वर्षे वाळू घाटांचे लिलाव झाले नव्हते. त्यात आता राज्य सरकारच्या नवीन धोरणामुळे वाळू घाटांचे लिलाव लांबले आहेत. त्यामुळे वाळूतस्करांना सुगीचे दिवस आले आहे. जिल्ह्यातील वाळू घाटांवरुन मोठ्या प्रमाणात दिवसरात्र वाळूचा उपसा सुरूअसून यातून वाळू तस्कर दिवसेंदिवस गब्बर होत असल्याचे चित्र आहे. नवीन धोरणाची अंमलबजावणी करण्यास विलंब करून शासन एक प्रकारे वाळू तस्करांना सधन करण्याचे काम करीत असल्याचे चित्र आहे.

गोंदिया जिल्ह्यातील ३३ वाळू घाटांच्या लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाली होती. पण शासनाने वाळू घाटांसाठी नवीन धोरण तयार केले आहे. यानुसार पुढील प्रक्रिया केली जाणार आहे. त्यामुळे वाळू घाटांचे लिलाव करूनये असे पत्र शासनाने दिले आहे.

**-सचिन वाढीवे,** जिल्हा खनिकर्म अधिकारी गोंदिया

## घरफोडी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीच्या सदस्याला अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**गोंदिया :** देवरी येथील महावीर राइस मिल व नवाटोलाच्या पंचमवार यांच्या घरून रात्रीच्या वेळी चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीच्या एका सदस्याला अटक करण्यात आली.ही कारवाई २८ मार्च रोजी पहाटे १.३० वाजता स्थानिक गुन्हे शाखेने केली.प्रदीप ऊर्फ दादू देवधर ठाकूर(३०),रा. देवघर मोहल्ला, खपराभाट, बालोद छत्तीसगड असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.आंतरराज्यीय घरफोडीचे आरोपी प्रदीप ऊर्फ दादू देवधर ठाकूर (३०), नरेश महिलांगे व रणजित या तिघांवर नागपूर,भंडारा व गोंदिया जिल्ह्यात गुन्हे दाखल आहेत.२६ मार्चच्या पहाटे ५ वाजता देवरीच्या महावीर राइस मिलच्या दाराचे कुलूप तोडून ३ अनोळखी चोरट्यांनी मिलमधील ४ लाख ३८ हजार रुपये रोख पळविला होता.त्याच दिवशी नवाटोला येथील कृष्णा चंद्रया पंचमवार (६०) यांच्या घराचे कुलूप तोडून त्याच ३ अनोळखी चोरट्यांनी एक तोळे सोन्याची साखळी व रोख रक्कम असा एकूण ६२ हजार रुपयांचा माल चोरून नेला होता.तसेच कोहमारा येथील सहकारी सोसायटीचे शटर तोडून चोरीचा प्रयत्न केला होता.या तिन्ही गुन्ह्यांची नोंद पोलिसांनी घेतली. गोंदिया जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत्या चोरीचे प्रमाण पाहता पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलिस अधीक्षक अशोक बनकर यांनी चोरट्यांचा शोध घेण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले.पोलिस निरीक्षक दिनेश लबडे यांनी दोन वेगवेगळे पथक तयार करून आरोपीच्या शोधात रवाना केले होते.यातील आरोपी प्रदीप ऊर्फ दादू देवधर ठाकूर (३०) याने आरोपी नरेश महिलांगे, रणजित यांच्या मदतीने चोरी केली होती.

# मालमत्ताधारकांवर आकारणार २४ टक्के दंड

**गोंदिया:** गोंदिया नगर पालिकेची मालमत्ता कर थकबाकी मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. गेली दोन वर्षे कोरोना संक्रमण काळ असल्यामुये पाहिजे त्या प्रमाणात वसुली झाली नाही. आता मात्र पालिकेने वसुली मोहिमेला जोर देण्याचा निर्धार केला आहे. ९.१९ कोटी रुपयांचा कर वसुल करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्यातील ४४ टक्के वसूली पूर्ण झाली असून केवळ ६ दिवस शिल्लक असून ५६ टक्के कर वसूल करावयाचे आहे. ३१ मार्च पर्यंत जे थकबाकीदार कर भरणार नाही. त्यांच्याकडील थकबाकीवर २४ टक्के व्याज आकारुन वसूली करण्यात येणार आहे.

नगर पालिकेने मार्च महिन्यापासून कर वसुली मोहिम जोमात राबविणे सुरु केले होते. मात्र कर्मचाऱ्यांचा राज्यव्यापी संप सुरु झाल्यामुळे वसुली मोहिमेला खंड पडला होता. शहरातील मालमत्ता धारकांकडील थकबाकीचे प्रमाण वाढत चालले आहे. ९.१९ कोटी रुपये मार्च अखेरपर्यंत वसूल करण्याचा चंग पालिका प्रशासनाने बांधला आहे. त्याकरिता मोहिम देखील राबविण्यात येत आहे. जे थकबाकीदार एक वर्षापेक्षा अधिक काळापासून कराचा भरणा करत नाहीत. अशांना नोटीस देवून मालमत्ता सील देखील करण्यात येत आहेत. आता संप मागे घेण्यात आला असून वसूली मोहिम पुन्हा जोमाने सुरु करण्यात आली आहे. यासंदर्भात नगर पालिकेचे उपमुख्याधिकारी विशाल बनकर यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले ३१ मार्चपर्यंत जास्तीत-जास्त कर वसूल करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. ३१ मार्च पयरंत जे मालमत्ताधारक कराचा भरणा करणार नाहीत. १ एप्रिलपासून जो कर थकबाकी आहे. त्यांच्याकडून २४ टक्के दंड आकारण्यात येणार आहे. यात कोणत्याही प्रकारची सूट देण्यात येणार नाही. नागरिकांना कर भरण्याकरिता कसल्याही प्रकारची अडचण येवू नये, याकरिता शनिवार आणि रविवारी देखील कर विभाग सुरु ठेवण्यात आले आहे. नागरिकांनी थकबाकी भरुन पालिकेला सहकार्य करुन आपल्यावर होणारी कारवाई टाळावी, असे आवाहन देखील विशाल बनकर यांनी केले.




# नक्षल्यांचे जुन्या पेन्शनला समर्थन!

**गोंदिया:** गेल्या आठवड्यात जुन्या पेन्शनला घेऊन राज्य सरकारी कर्मचारी व अधिकारी वर्गाने आंदोलन करून सरकारला जेरीस आणले होते. मात्र, संघटनाच्या समन्वय समितीने संप मागे घेतल्याने जुन्या पेन्शनचा प्रश्न तसाच कायम राहिलेला असताना रविवारला २६ मार्चला गोंदिया जिल्ह्यातील आमगाव-सालेकसा मार्गावर बाघ नदीच्या पलीकडे "सीपीआय माओवादी' या नक्षल संघटनेचे जुन्या पेन्शनला समर्थन असल्याचे बॅनर आढळून आले. यामुळे खळबळ उडाली. यातील बॅनर नवीन पेन्शन योजना रद्द करण्यात यावे, ठेकेदारीकरण बंद करण्यात यावे. मेस्मा कायदा लागू करणा?या शिंदे-फडणवीस सरकारचा मुर्दाबाद अशा अनेक घोषणा बॅनरमध्ये लिहिलेल्या आहेत. सोबतच काढलेले पत्रक हे महाराष्ट्र मध्यप्रदेश छत्तीसगड झोनल (माओवादी) कमेटीचे प्रवक्ता अनंत यांच्या नावे आहे. सदर फलक लागलेले असल्याची माहिती मिळताच घटनास्थळी जाऊन ते फलक काढण्यात आले आहे.



या प्रकरणाचा तपास सुरू केला असल्याची माहिती सालेकसा चे पोलीस निरीक्षक बोरसे यांनी दिली. सदर लावण्यात आलेले फलक नक्षल्यांनीच लावले की कुणी कुरघोडी करण्याच्या उद्देशाने लावले याचा तपास सुरू असल्याची माहिती गोंदिया जिल्हा नक्षल सेलचे प्रमुख दिनेश तायडे यांनी दिली.

## नक्षलवाद्यांचा घातपाताचा डाव उधळला

**अहेरी-** भामरागड तालुक्यातील नेलगुंडा गावानजीक रस्त्याच्या कडेलगत नक्षलवाद्यांनी पुरुन ठेवलेली शक्तीशाली स्फ ोटके शोधण्यात विशेष अभियान पथकाच्या पोलिसांना यश आले आहे. "टीसीओसी' च्या पार्श्वभूमीवर मोठा घातपात धडवून आणण्याचा नक्षलवाद्यांचा डाव जवानांनी उधळून लावला आहे.

नेलगुंडा परिसरात प्राणहिता पोलीस उपमुख्यालयातील नक्षलविरोधी अभियान पथकाचे जवान काल सकाळपासून नक्षलविरोधी अभियान राबवीत असताना त्यांना जमिनीत स्फोटके आढळून आली. तीन वायर बंडल, बॅटरी, डेटोनेटर इत्यादी साहित्य पोलिसांनी शिताफीने बाहेर काढून बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या मदतीने ही स्फोटके नष्ट करण्यात आली. यामुळे मोठा घातपात टळला. पोलीस अधीक्षक नील-ोत्पल, अहेरीचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

# सदस्यांची निवडणूक न झाल्याने विशेष निमंत्रित लोकप्रतिनिधींचे डीपीडीसीवर वर्चस्व

**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया-** जिल्हा नियोजन समिती सदस्यांच्या निवडणुकीची प्रक्रिया अद्याप सुरु करण्यात न आल्याने वर्षभरापुर्वी निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांना अद्यापही नियोजन समितीमध्ये पोचता आले नाही.२०२० पासून जिल्हा परिषदेचे सदस्य नियोजन समितीमध्ये नसल्याने जिल्हा नियोजन समितीच्या नियोजनावर विशेष निमत्रिंत असलेल्या आमदार व खासदारांनी आपले वर्चस्व दाखवायला सुरवात केल्याने जिल्हा परिषदेच्या सदस्यामध्ये नाराजी दिसून येत आहे.

राज्यात भाजप शिंदेगटाची व जिल्हा परिषदेत भाजपची सत्ता असूनही लोकप्रतिनिधी मात्र जिल्हा परिषदेतील सत्ताधारी भाजपच्याच नियोजनाला जिल्हा नियोजन समितीमध्ये वाटाणाच्या अक्षता दाखवित असल्याचा सूर हळूहळू बाहेर येऊ लागला आहे.जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रात पर्यटन व तिर्थक्षेत्र विकास,ग्रामपंचायतकरीता जनसुविधा, आरोग्य, शिक्षणाच्या अनेक योजना राबविल्या जातात.याकरीता पंचायत विभाग, शिक्षण,आरोग्य विभागाच्यावतीने कामांची यादी तयार करुन ती जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुर केल्यानंतर जिल्हा नियोजन विभागाकडे सादर केले जाते.मात्र जिल्हा नियोजन समितीमध्ये जिल्हा परिषदेचे पदसिध्द अधिकृत निवडून जाणारे सदस्यच नसल्याने लोकप्रतिनिधी त्या प्रस्तावाला बाजूला सारत आपली यादी समोर करुन नियोजन करीत असल्याची चर्चा जिल्हा परिषदेच्या वर्तुळात सुरु झाली आहे.

जनसुविधेच्या ग्रामीण भागा-तील ५४७ ग्रामपंचायती व नागरी योजनेतील १५ ग्रामपंचायतीच्या विकासाकरीता सुमारे १८ कोटी रुपयाचे नियोजन जिल्हा नियोजन समितीने केले आहे.या जनसुविधेच्या कामाकरीता जिल्हा परीषदेच्या ५३ सदस्यांनी आपल्या मतदारसंघातील कामांची यादी जिल्हा परिषदेला सादर केली.त्या यादीला जि.प.च्या सर्वसाधारण सभेतून मंजूरीही दिल्याचे वृत्त आहे.मात्र या यादीखेरीज विशेष निमंत्रित असलेल्या सदस्यांनी आपली वेगळी यादी तसेच ३०/५४ व ५०/५४ योजनेंतर्गत माजी लोकप्रतिनिधींनी आपली यादी नियोजन विभागाकडे सादर केल्याने जिल्हा परिषदेच्या सदस्यांना वाटयाला येणाऱ्या निधीवर या लोकप्रतिनिधींनी डोळा घातल्याचे बोलले जात आहे.



विशेष म्हणजे पालकमंत्री सुध्दा जिल्हा परिषदेतील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याने कार्यकर्त्यांना काय सांगावे या विवंचनेत जिल्हा परिषदेचे सदस्य सापडले आहेत. ३० सदस्यीय जिल्हा नियोजन समितीमध्ये ६ सदस्य हे पदसिध्द असतात यामध्ये अध्यक्ष, जिल्हाधिकारी,मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक,पोलीस अधिक्षक तर २४ सदस्य हे निवडून द्यावयाचे असून यापैकी २० सदस्य हे जिल्हा परिषदेतून निवडून द्यावयाचे आहे.

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला वर्ष लोटूनही या सदस्यांच्या निवडीकरीता अद्यापही निवडणुक कार्यक्रम जाहीर झालेला नाही.तर ४ सदस्य हे नगरपरिषद क्षेत्रातून निवडून द्यावयाचे आहे.या ४ सदस्याकरीता मात्र २० सदस्यांना वेठीस धरले जात आहे.जिल्ह्यातील सर्व आमदार व खासदार हे विशेष निमंत्रित सदस्य असतात.परंतु सध्याच्या घडीला या विशेष निमंत्रित सदस्यांनीच जिल्हा नियोजन समितीवर कब्जा केल्याने जिल्हा परिषदेच्या नियोजनाला पाहिजे तो न्याय मिळतांना दिसून येत नाही.

महिलांना पन्नास टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहे जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या जिल्हा नियोजन समितीत पूर्वी आमदार,खासदार व सरकार नियुक्त अशासकीय सदस्यांचा समावेश होता.त्यातही ज्या पक्षाचे सरकार असेल,त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचीच वर्णी या समितीवर लागत असल्यामुळे राजकीय सोय म्हणूनही या समितीकडे पाहिले जात होते.काही वर्षापूर्वी सरकारने या धोरणात बदल करून विकासाच्या प्रश्नावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींचा सहभाग घेण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार निवडणुक घेऊन जिल्हा परिषद व नगरपरिषदेतन सदस्य निवडले जाऊ लागले.

३० सदस्य असलेल्या या समितीत जिल्हा परिषद,व नगरपालिकेच्या सदस्यांना प्रतिनिधित्व मिळाले,त्यातही ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतला आहे.जोपर्यंत हे सदस्य त्या त्या सभागृहाचे सदस्य आहेत,तोपर्यंत त्यांचे नियोजन समितीचे सदस्यपद अबाधित राहणार आहे.

## संपादकीय

### लाचखोर भामट्यांना समाजानेच धडा शिकविणे गरजेचे!

लाचखोरांनी जनाची आणि मनाची सर्व विकून खाल्ली आहे. कर्मचाऱ्यांचा संप होता तेव्हाही लाचखोर भामटे पकडले गेले. हाईट म्हणजे संप मागे घेवून तास होत नाही तोवर लाचखोर समाजद्रोही पकडला गेला. राज्यात मागील अडीच महिन्यात तब्बल २५६ सरकारी अधिकारी व कर्मचारी लाच घेताना पकडले गेले आहेत. त्याची लाचेची रक्कम तब्बल ९३ लाख रुपये इतकी आहे. ही लाचखोरी व लाचखोर समाजाला लागलेली कीड आहे. समाज रुपी वृक्षावर पोसली जाणारी ही बांडगुळे आहेत.

जनतेच्या घामाच्या कराच्या रकमेतून सातव्या वेतन आयोगाचे गलेलठ्ठ पगार घेवूनही लाचखोरीची विष्ठा खाल्याशिवाय यांचे समाधान होत नाही. जनता राब–राब राबून चरितार्थ चालविण्यासाठी दोन पैसे कमावते. त्यातून तब्बल १८ टक्के जीएसटी व वीस–तीस टक्के इन्कम टॅक्स भरते. त्या रकमेतून या लाचखोरांना सातव्या वेतन आयोगाचे गलेलठ्ठ पगार मिळतात. तरीही हे लाचखोर मेहनत करणारे सामान्य गरीब शेतकरी, छोटे मोठे दुकानदार यांच्याकडून लाचेची अपेक्षा ठेवतात. लाखभर पगार घेणारा दहाबारा हजारावर राब राब राबणाऱ्या सामान्य माणसा कडूनही लाचेची अपेक्षा करतो. त्यांचा आत्माच मरून गेला आहे. या काळ्या कमाईतून ते प्रचंड शौक पूरे करतात.

आपल्या समाजात पूर्वी म्हण होती कष्टाचे खावे हरामाचे खाउ नये. मात्र या लाचखोर हरामीची वर कमाईच पगारापेक्षा अधिक असते. एखाद्या वेळी पकडले गेले तर मग अपेक्षा करतात, की कुणी तरी त्यांच्या मदतीला यावे. सोडवणूक करण्यासाठी यावे. कुणीतरी त्यांच्यासाठी फोन करावा. लाचखोरी करताना यांनी कुणाला विचारले होते काय? पकडले गेलेले हे भामटे काही दिवस अर्धा पगार घेत घरी बसतात. पुन्हा सेटलमेंट करुन बदलीवर का असेना जावून बसतात. ही समाजाची फसवणूक आहे. मुळात अशा लाचखोरांना समाजाने देखील जाब विचारला पाहिजे. कारण या भामट्यांचे प्रमाण आता प्रचंड वाढून गेले आहे.

आपल्या आजुबाजुला कोण लाचखोर भ्रष्ट आहे ते शोधत राहिले पाहिजे. लहान लहान व्यावसायिक–गरीब दीन दुबळे व फाटक्या माणसांकडूनही हे भामटे लाच घेतल्या शिवाय त्यांचे योग्य कामही करीत नाहीत. काही भामटे तर ओळख–पाळख नातेवाईक यांच्या कडूनही योग्य कामातही अपेक्षा ठेवतात. या लाचखोरी विरोधात जनमताचा स्फोट व्हावा, अशी स्थिती आली आहे. शासन व कायदे यांच्यासाठी पुरेसे नाहित. खरेतर आता सर्व जनतेत–प्रत्येक समाज–समाजात अशा लांचखोरांना ओळखून त्यांना त्यांची जागा दाखविण्याची वेळ आली आहे. पूर्वी एक जेलर साहेब रिटायर्ड झाले होते. त्यांच्या समाजात त्यांना जागोजागी कार्यक्रमात बोलावले जात होते. ते मोठ्या अभिमानाने सांगत असत, की मी इतके जेल फिरलो पण मला एकाही जेल मध्ये आपल्या समाजाचा कैदी–गुन्हेगार किंवा आरोपी आढळून आला नाही! त्या समाजासाठी किती आनंदाची व अभिमानाची बाब होती ही!पण आज काय स्थिती आहे?आपल्या शेजारी आपल्या समाजाचा कुणी लाचखोर तर बसलेला नाही ना?असा प्रश्न प्रत्येक समाजात स्वतःशी विचारण्याची वेळ आली आहे. इतक्या मोठ्या संख्येने लाचखोर सापडत आहेत.

जेवढे सापडत आहेत त्याच्या शेकडो पट न पकडले गेलेले लाचखोर भामटे समाजात उजळ माथ्याने फिरत आहेत. या लाचखोरांकडे हरामाची प्रचंड संपत्ती असते. त्यामुळे या पापाच्या कमाईतून मोठमोठ्या देणग्या जाहीर करुन ते प्रतिष्ठा विकत घेण्याचाही प्रयत्न करतात. परंतु आता ही कीड प्रचंड वाढून गेली आहे. त्यामुळे समाजच पोखरला जात आहे. आता अशा लाचखोर भामट्यांना किती प्रतिष्ठा द्यावयाची? याचा विचार प्रत्येक समाजाने व एकूणच जनतेने केला पाहिजे. अन्यथा हे लाचखोर भामटे सारा समाज पोखरुन काढतील. यांना जनाची नसते व मनाचीही नसते. आपल्या पुढील पिढ्यांचे भवितव्य सुरक्षित करावयाचे असेल तर अशा लाचखोर भामट्यांना कायद्या सोबतच समाजानेही धडा शिकविणे गरजेचे आहे.

# पूर्णानगर(थुगाव) आणि वाठोडा शुकलेश्वर येथील सत्यशोधक समाज



सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

महात्मा जोतीराव फुले यांचे समकालीन असलेले नारायणराव रघुनाथराव नवलकर आणि त्यांचा मुलगा हरिश्चंद्रराव नारायणराव नवलकर, हेडमास्टर श्री.आनंदस्वामी इंग्लीश स्कूल मु.वडगाव रासार्ड, पोस्ट पारगाव जि.पुणे यांनी महात्मा जोतीराव फुले दिवंगत झाल्यानंतर सत्यशोधक समाजाचे सचिव म्हणून कार्य केले. त्यांनी सत्यशोधक महासाधू श्री तुकाराम महाराज हे पुस्तक त्यांनी १९२९ साली लक्ष्मणभाऊराव कोकाटे, हनुमान प्रेस ३०० सदाशिव पेठ पुणे येथे प्रकाशित केले. आणि हे पुस्तक वऱ्हाडातील शिरजगाव येथील (चांदुरबाजार तालुका हल्लीचा) झुंझार व्यक्तिमत्व, आश्रितांचा इतिहास लिहिणारे अभ्यासक काशीराव देशमुख, संपादक सुबोध ग्रंथमाला अमरावती यांना अर्पण केले होते. त्यांची नवीन स्वरूपाची आवृत्ती नव्या प्रस्तावनेसह मराठा सेवा संघाचे प्रकाशन जिजाई च्यावतीने संपादक डॉ. अशोक चोपडे यांनी संपादीत केली. त्या पुस्तकाच्या शेवटी कित्येक ठिकाणचे सत्यशोधक समाज म्हणून महाराष्ट्रातील शाखेचे अध्यक्ष आणि सेक्रेटरीचे नावे आहेत. सोबत गावाचे नावे सुद्धा. त्यावरुन पूर्णानगर (थुगाव) ता.भातकुली, जि.अमरावती या शाखेचा उल्लेख आहे. त्या विषयाची माहिती अशी.

थुगाव (जि.अमरावती वऱ्हाड)

अध्यक्ष–श्री सिताराम परशरामजी देशमुख, सेक्रेटरी–श्री शामराव रामजी वानखडे (हेडमास्टर), अमरावती परतवाडा (अचलपूर) महामार्गावर अमरावतीपासून जवळपास २०–२५ किलोमीटर अंतरावर असणारे हे गाव आता जवळपास १५–२० हजाराच्या लोकसंख्येऐवढे असावे. या राज्य मार्गावर फाट्यापासून जवळपास दीड–दोन किलोमीटर अंतरावर थुगाव नावाचे गाव आहे. आज त्याचे नामकरण पूर्णानगर असे करण्यात आले आहे.

या ठिकाणी सत्यशोधक समाज कार्यरत होता. त्या शाखेचे अध्यक्ष श्री. सीताराम परशरामजी देशमुख हे होते. ते अत्यंत विद्वान गृहस्थ होते. त्यांनी दीनमित्र या पत्रामध्ये लेख लिहिलेले आढळतात. त्याचप्रमाणे त्यांनी माळी कर्मधर्मानुसार हा ग्रंथ सुद्धा लिहिलेला होता. ते अमरावती येथील ९ व्याा माळी शिक्षण परिषदेत सक्रिय होते. त्यांचा वरील ग्रंथ आज उपलब्ध असलेला दिसत नाही. ते गावात श्रावणी वेदोक्त प्रकारे गावात करीत असत. याशिवाय गावात ब्राम्हणांच्या शिवाय विधी करीत असत. सीतारामजी यांना नरसिंग नावाचा मुलगा होता. नरसिंग यास पाच मुले होते. यातील फक्त अशोकराव पूर्णानगर येथे राहतात. बाकी सर्व बाहेरठिकाणी वास्तव्यास आहेत. नरसिंग यांचा जन्म १२/०७/१९१३ चा असून मृत्यू २/०९/१९८६ चा आहे. सेक्रेटरी असलेले श्री.शामराव रामजी वानखडे (हेडमास्टर) यांच्याविषयी येथे कोणतीही माहिती उपलब्ध होत नाही.

याच गावी १९२५ साली शंकरराव काळे विंचूरकर यांचा सत्यशोधक जलसा झाला होता. तेव्हापासून ब्राम्हणेतरांचे डोळे स्पष्टपणे उघडले होते. या ठिकाणी श्री शिवाजी वाचनालय उघडण्यात आले. त्याला बालसमाज जोडण्यात आला. लग्नविधी कार्यात पुरोहिताचे काम ब्राम्हणेतरांकडून होत असल्यामुळे भर भिक्षुकांची खाण्याची तोंडे बंद पडली होती. तसेच गंधर्व विवाह, साखरपुडा व सत्यनारायण इत्यादी कार्ये समाजाकडून झाली होती.

श्री.शंकरराव यशवंतराव देशमुख, शंकर काशीराव देशमुख व लक्ष्मणराव देशमुख हे कोणत्याही भटांच्या दबावास बळी न पडता पुरोहिताचे काम निर्भिडपणे करीत होते. अशी बातमी ८ माहे जुलै १९२५ ला दीनमित्र पत्रास अंबादासराव विठ्ठलराव तायडे यांनी कळविली होती. याच पत्रात २९ माहे जुलै १९२५ ला हरिभाऊ इंजीनियर यांनी कळविले की, शाहू महाराजांच्या फोटोची जंगी मिरवणूक काढून जाहीर सभा घेण्यात आली होती. यावेळी श्री. लक्ष्मण नारायणराव तायडे सभेचे अध्यक्ष होते. अशाप्रकारे या गावात सत्यशोधक चळवळ रुजली होती.

वाठोडा शुक्लेश्वर

येथे १९२७ साली ब्राम्हणेतरांची जाहिर सभा झाली होती. तसेच सत्यशोधक जलसा सुद्धा झाला होता. या सभेचे अध्यक्ष ॲड.अमृतकर वकील (मोर्शी) हे होते. यावेळी बॅरीस्टर पंजाबराव देशमुख, दादासाहेब कोळेकर वकील हजर होते. कासारखेडांचा जलसा झाला होता. अमरावती जिल्हा सत्यशोधक समाज परिषद याच गावी २७/०२/१९२९ साली संपन्न झाली होती. यावेळी अमृतकर वकील, पंढरीनाथ पाटील व आनंदस्वामी उपस्थित होते. (संदर्भ– सत्यशोधक चळवळीचे साहित्य, डॉ. अशोक चोपडे, वर्धा क्रॅन्डीड प्रकाशन)

वाठोडा शुक्लेश्वर हे गाव पुर्वी अमरावती तालुक्यात आणि आता भातकुली तालुक्यात समाविष्ट असून अमरवती–दर्यापूर या राज्य महामार्गावर म्हैसपूर फाट्यापासून साधारण तीनेक किलोमीटर अंतराव तर दारापूर या बस स्टॅंडपासून पाचेक किलोमीटर अंतरावर असणारे आडवळणीचे गाव असून गावाची लोकसंख्या १० हजाराच्या आसपास असावे. या गावाला शुक्लेश्वर (महादेवाचे) पुरातन मंदिर असून याला अर्धकाशी किंवा विदर्भकाशी म्हणून सुद्धा ओळखले जाते.

येथे सत्यशोधक समाज कार्यरत होता. अध्यक्ष श्री. यक्षप्रसाद धुले होते. परंतु त्यांच्याविषयी काही माहिती मिळत नाही. परंतु सेक्रेटरी श्री बोंद्राजी रामजी धुले यांच्याविषयी माहिती उपलब्ध होते. त्यांच्या वडीलांचे नाव राणूजी होते. तर धुले हे आडनाव चुकीचे असून धुरडे होते. ते धनगर समाजातील होते. या गावात ब्राम्हणाशिवाय धार्मिक विधी करीत असत. त्या काळात ते ४ था वर्ग शिकलेले होते. लिखापडीचे व वैद्यकी सुद्धा करीत असत. त्यांना खूब त्रास ही सहन करावा लागला. १५ वर्षे ते न्याय पंचायतीचे ते अध्यक्ष होते. काही वर्षे सरपंच होते. त्यांना दोन मुले होती. त्यापैकी एक मुलगा अमरावती येथे असून त्यांचे नाव पंजाबराव असून ते मोतीनगर येथे वास्तव्यास आहेत. दुसरे गंगाधरराव हे सुद्धा त्याच ठिकाणी राहतता. बोंद्राजी यांचा जन्म २०/८/१९०३ ला झाला होता. त्यांचा ३१/१०/१९९० साली मृत्यू झाला होता. (छाया चित्रावरुन ही तारीख मिळाली आहे.)

वाठोडा शुक्लेश्वर या गावाला लागूनच असलेल्या दारापूर (दादासाहेब गवई, माजी राज्यपाल) यांच्या गावी सुद्धा सत्यशोधक समाज होता. येथे विंचुरकर रा.बजाबा गायकवाड यांचा जलसा झाला होता. या जलशाला शामराव पाटील यांनी त्याद एक तोळा वजनाचे सुवर्णपदक अर्पण केले होते. (दीनमित्र पुरवणी ता.२१ माहे याने.१९२५) तसेच या गावी श्री शिवाजी लायब्ररी उघडण्यात आली होती. त्यास कृष्णराव चौधरी करजगावकर यांनी पुस्तके बक्षीस दिली होती. भालचंद्र पंढरीनाथ खेळकर (संपादक मराठा समाचार) आणि सिताराम केशव बोले (जे.पी.एमएलसी संपादक नवयुग) यांनी वर्तमानपत्रे मोफत दिली होती. बळीराम खोलकार यांनी सुबोध श्लोकाच्या २५ प्रती मोफत खाऊ म्हणून मुलांना वाटल्या होत्या. (पुरवणी दीनमित्र ता.१५ जुलै १९२५) याच गावापासून जवळ असणारे खल्लार (बेंबळा) ता.दर्यापूर येथे सुद्धा सत्यशोधक समाज मनाप्रमाणे उत्तरक्रिया पार पडली होती. तसेच दीनमित्र पत्रास दोन रुपये मदत दिली होती. अशाप्रकारे या परिसरात सत्यशोधक चळवळ कार्यरत होती. असे दिसते.



# नालंदा विद्यापीठ

नालंदा विद्यापीठ: विश्व जगतात सर्वात प्राचीन बौद्ध विश्वविद्यालय म्हणून नालंदा विद्यापीठाची ख्याती आहे. नालंदा हे बिहार राज्यातील सुप्रसिद्ध अस्रे प्राचीन बौद्ध अवशेषांचे एक स्थळ आहे. नालंदा हे बुद्धाचे पट्टशिष्य सारीपुत्त ह्यांचे जन्मस्थान असल्यामुळे बौद्धांचे प्रसिद्ध तिर्थक्षेत्र होते.ते गंगेच्या काठी पाटण्याच्या आग्नेयीस सुमारे ७० कि.मी.वर व राजगिरच्या उत्तरेस ११–२७ किमी.वर वडगाव नामक खेड्याच्या परिसरात वसले होते.नालंदा हे प्राचीन विद्यापीठ म्हणून भारतात ख्यातनाम होते. प्राचीन काळात नालंदाची नल, नालक, नालकग्राम, नालंद वगैरे भिन्न नामांतरे आढळतात. नालंदा या नावाविषयी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत.इ.स.४१० मध्ये चिनी यात्रेकरूफाहियान यांने नालंदाला भेट दिली होती,त्यावेळी नालंदाचे हे विहार बौद्धाचे विद्यालय (बौद्ध विद्यालय) होते.तरी सुद्धा वडगावच्या ह्या नालंदा बौद्ध विहारात,इ.स.च्या तिसऱ्या शतकात नागार्जुन आणि इ.स.३२० मध्ये आर्यदेव हे दोन विद्वान पंडीत निर्माण झालेत यावरुन या विद्यापीठाचे प्राचीन काळात किती महत्व असेल याची कल्पना येते.

नालंदा विद्यापीठाची जागा प्रशस्त व निसर्गरम्य होती. एका विस्तृत परकोटात विद्यपीठाच्या इमारती होत्या.या इमारतीपैकी काही महाविद्यालयाच्या काही ग्रंथालयाच्या तर काही आचार्याच्या व विद्यार्थ्यांच्या निवासासाठी इमारती होत्या.काही इमारती दोन मजली,काही चार मजली तर काही नऊ मजली होत्या. इमारतीच्या भिंती व स्तंभ अलंकृत होते.विद्यापीठाच्या भोवताली अत्यंत रमणीय बाग होती.ठिकठिकाणी कमळांची सरोवरे होती.निवास स्थानात विपूल प्रमाणात स्नानगृहे व इतर आवश्यक सोयी होत्या.तसेच विद्यापीठाच्या प्रांगणात क्रिडांगणे होती. या विद्यापीठात जवळपास १५१० अध्यापक आणि१०,५०० विद्यार्थी शिक्षण घेत होते.नालंदा विद्यापीठातील धर्मगंज या विभागात जगप्रसिद्ध नालंदा विद्यापीठाचे विशाल ग्रंथसंग्रहालय होते. ग्रंथसंग्रहालयाच्या तीन इमारती होत्या, त्यांची नोंद "धर्मगंज' मध्ये रत्नसागर, रत्नोदधी आणि रत्नरंजन नावाच्या तीन इमारतीत नालंदा विद्यापीठाचा ग्रंथसंग्रह सामावलेला होता. यापैकी रत्नोदधी ही इमारत नऊ मजली होती आणि प्रामुख्याने या इमारतीत तांत्रिक पंथासंबंधीचे वाड्मय होते. रत्नसागर आणि रत्नरंजन ह्या दोन इमारती सहा मजली होत्या. या तीन इमारतीमध्ये नालंदा विद्यापीठाचे लक्षावधी ग्रंथ ठेवण्यात आले होते. एवढा प्रचंड ग्रंथ संग्रह त्या काळात जगाच्या पाठीवर कुठेही नव्हता. येथील ग्रंथांना रत्न समजून ग्रंथालय भवनांना इतकी यथार्थ नावे दिलेली होती की ती अन्यत्र कुठेही आढळत नाही.

नालंदा विद्यापीठातील अभ्यासक्रम उच्च कोटीचा होता. तसेच या विद्यापीठात उच्च शिक्षणाचीच सोय होती. त्यात व्याकरण, साहित्य, तर्कशास्त्र, धर्मशास्त्र, योग्यविद्या व अठरा संप्रदाय या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश होता. बौद्ध धर्माशिवाय जैन व हिंदू धर्माचेही तत्वज्ञान नालंदा विद्यापीठात शिकविले जात होते. धर्मग्रंथाबरोबरच व्यवहारिक विषयांचे ज्ञानही येथे दिले जाई. चित्रकला, शिल्पकला, मंत्रविद्या, गणितशास्त्र, स्थापत्यकला अशा विविध विषयांचे अध्ययन नालंदा विद्यापीठात त्यावेळी होत होते. त्याच प्रकारे विविध भाषांचेही अध्यापन येथे चालत होते.

परदेशातूनही विद्यार्जनाच्या ओढीने विद्यार्थी नालंदा विद्यापीठात येऊन नालंदा विद्यापीठाची ख्याती लवकरच सर्वत्र पसरली होती. विद्यापीठात प्रवेश दुर्मिळ होता. नालंदा विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परिक्षा होत असे.प्रवेश परिक्षेत अत्यंत कठीन प्रश्न विचारले जात असत. प्रवेश परिक्षा खुप कठीन होत असे.प्रवेश परिक्षेत केवळ २०% ते ३०% विद्यार्थी उत्तीर्ण होत असत आणि तेवढ्यानांच विद्यापीठात प्रवेश मिळत असे विद्यार्जन निःशुल्क होते. एवढेच नव्हे तर विद्यापीठातील आचार्यासाठी ज्याप्रकारे भोजन–निवासाची व्यवस्था होती. त्याच प्रकारे विद्यार्थ्यासाठी ही निवासाची व्यवस्था केलेली होती.

नालंदा विद्यापीठात ऋषीतुल्य आचार्याची फार मोठी परपंरा निर्माण झाली.धर्मपाल,चंद्रपाल,गुणमती, स्थिरमती,प्रभामित्र,ध्यानचंद्र, शीलचंद्र यासारखे श्रेष्ठ कुलपती नालंदा विद्यापीठात होऊन गेले. नालंदा विद्यापीठाच्या प्रदीर्घ पंरपरेत नागार्जुन,आर्यदेव,वसुबंधू,अंग, शीलभद्र,शांतरक्षित,जिनमित्र व ज्ञानचंद्र यासारखे थोर विद्वान आचार्य नालंदा विद्यापीठातून होऊन गेले.येथील आचार्य सर्व प्रकारच्या विद्यामध्ये पारंगत (निपून) होते. त्याही पलीकडे त्यांनी तत्वज्ञान, न्यायशास्त्र व तंत्रज्ञान यासारख्या विषयावर महत्वपूर्ण ग्रंथही लिहलेत. विशुद्ध चारित्र्य आणि अजोड विद्वता याबद्दल या सर्व ऋषीतुल्य आचार्याची सर्वत्र ख्याती होती.

नालंदा विद्यापीठामध्ये चीन, मंगोलिया, थाईलंड, श्रीलंका, बर्मा, कोरिया इत्यादी देशातून विद्याथी विद्यार्जनाकरिता येत होते. विद्यार्थ्यांकडून कोणत्याच प्रकारची शुल्क घेत नव्हते. विद्यार्थ्यांसाठी भोजनाची व्यवस्था व वस्त्र मोफत दिले जात होते. या विद्यापीठाकरिता धन (संपत्ती) गावा–गावातून येत होते. यांच्या नावाकरिता २०० समृद्ध गांव लागलेले होते. ज्यांच्या मधून ५०% धन एकट्या सम्राट हर्षवर्धनांनी दिलेले होते ही गोष्ट बौद्ध जगतात गौरवाचा विषय आहे. तथागत बुद्धाच्या काळात नालंदा एक समृद्ध गाव होता.या विद्यापीठात बौद्ध धम्मच्या अनुयायांची संख्या जास्त होती. येथे प्रावारिक नावाच्या एक श्रीमंताने तथागत प्रावारिक भवन आणि आम्रवन दान दिलेले होते. या ठिकाणी कधी–कधी तथागत बुद्ध निवास करीत होते. एक वेळा तर महावीर जैन आणि तथागत बुद्ध एकाच वेळी नालंदा मध्ये थांबले होते.

बौद्ध धर्मग्रंथाचे अध्ययन करणे आणि धार्मिक स्थळांना भेटी देणे हा ह्यू–एन–त्संगाचा भारत भेटीमागील मुख्य उद्देश होता.नालंदा विद्यापीठात त्याने संस्कृतचे व बौद्ध तत्वज्ञानाचे अध्ययन केले. नालंदा वर्षे राहून विद्यापीठात असतांना त्यांनी अध्यापनाचेही कार्य केले. सातव्या शतकात नालंदा विद्यापीठात आलेल्या ह्यू–एन– त्संगांने नालंदा विद्यापीठासंबंधी सविस्तर माहिती लिहून ठेवलेली आहे. ह्यू–एन–त्संग नालंदा विद्यापीठात आले त्यावेळी म्हणजेच सम्राट हर्षवर्धनाच्या काळात नालंदा विद्यापीठामध्ये १०,००० विद्यार्थी अध्ययनाचे कार्य करीत होते. व १५०० शिक्षक अध्यपनाचे कार्य करीत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरुपद शिलभद्र याने भूषविले होते. प्रतिदिन वाद–विवाद व चर्चा आयोजित केल्या जात. विद्यापीठात रोज १०० भाषणे व परिसंवाद विद्वानाकडून होत असत. विद्यार्थ्यांना राहण्यासाठी अभ्यास वर्गासाठी होत्या. असलेल्या खोल्यांची संख्या ३,००० ते ४,००० होती. १,००० मोठ्या खोल्या अभ्यास वर्गासाठी होत्या.

सम्राट हर्षवर्धनाच्या काळात नालंदा विद्यापीठ जगविख्यात विद्याकेंद्र होते. या विद्यापीठात शिक्षणासाठी देशाविदेशातून हजारोंच्या संख्येने विद्यार्थी येत असत.आशिया खंडातील प्रसिद्ध बौद्ध विद्यापीठ म्हणून नालंदा विद्यापीठ प्रख्यात होते. सम्राट हर्षवर्धनांने नालंदा विद्यापीठाच्या योगत्येसाठी चालत असे शिवाय हर्षाचा राजाश्रय होताच.

इ.स. १२०० च्या सुमारास मुहमंद बिन बखत्यार खिलजीने "ज्ञान कुराणातच आहे, अन्यत्र नाही." अशा भ्रामक व खुळचट समजुतीने नालंदा विद्यापीठावर ब्राह्मणांच्या मदतीने घणाघाती प्रहार केला. विद्यापीठातील हजारों भिक्खूची, अध्यापकाची सरसकट कत्तल करण्यात आली. अतिशय खुणशीपणाने व क्रोर्याने 'जिहाद' च्या भावनेतून धर्मवेड्या मुसलमानांनी नालंदा विद्यापीठाचा विध्वंस करुन नालंदा विद्यापीठ जाळून टाकले. या क्रुर, अमानुष, रानटी विध्वंसात 'धर्मगंज' विभागातील लक्षावधी बहुमोल ग्रंथसंपदा आगीच्या भक्षस्थानी पडून जळून खाक झाली.

आज नालंदा विद्यापीठाचे अवशेष देखील पहायला दुर्लभ झाले आहे.

नालंदा विद्यापीठाचे वास्तविक महत्व इ.स. पाचवी शताब्दी मध्ये गुप्त वंशीय राजाच्या शासन काळापासून प्रकाशात येते. जेव्हा भारतात प्रथम विश्वविद्यालयाची स्थापना झाली. यापूर्वी भारतीय शिक्षण व्यवस्था दोन स्वरुपात (प्रकारची) होती. पहिल्या प्रकारची शिक्षण व्यवस्था केवळ समाजातील उच्च वर्णीय लोकांकरिता होती. आणि दुसरी शिक्षण व्यवस्था आचार्य आपल्या घरीच शिष्याच्या समूहाला शिक्षण देत होते. ज्याला गुरुगृह (पूर्वीची आश्रम व्यवस्था) म्हटल्या जाते. परंतु बौद्धांनी शिक्षण हे जन सामान्यकरिता उपलब्ध करून दिले. आणि विहारातून बौद्ध विश्वविद्यालयात झाले आणि ज्यात नालंदा हे सर्वात पहिले विद्यापीठ होते.

भारतीय इतिहास कोश नावाच्या ग्रंथात लिहले आहे की, गुप्त सम्राट बालदित्यने सन ४७० इ. मध्ये नालंदा मध्ये एक सुंदर विहार निर्माण केले आणि त्यामध्ये तथागत बुद्धाची ८० फूट उंचीची ताब्यांच्या मूर्तीची स्थापना केली.

नालंदा विद्यापीठाची पुरातात्वीक साक्ष म्हणजे कुमारगुप्त प्रथम च्या काळातील मिळालेले सिक्के आहेत. युवान च्वांग च्या अनुसार गुप्त वंशाच्या पाच राजांनी क्रमश पाच विहार निर्माण केले होते. या व्यतिरिक्त बालदित्यने सुद्धा एक विहार बांधले होते.सहावा विहार मध्य भारताच्या शासकाने बनविले होते.गुप्त शासकांची नालंदा विद्यापीठाच्या संदर्भात रुवी म्हणजे नरसिंहगुप्त, कुमारगुप्त (II) बुद्धगुप्त व विष्णुगुप्त यांची येथील मिळालेल्या शिलावरुन त्याची रुची स्पष्ट होते.

बौद्ध जगतात नालंदा विद्यापीठाची प्रसिद्धी अन्तरराष्ट्रीय ख्यातीची होती. इथे मिळालेले या काळातील ताम्रपत्र अभिलेखावरुन या विद्यापीठाच्या अन्तरराष्ट्रीय ख्यातीची कल्पना करता येईल.या प्रसिद्ध बौद्ध विद्वानाचे गंभीर ज्ञान, अथक परिश्रम आणि अनुशासीत आचरण इत्यादी. पाल राजाच्या शासन काळात नालंदा विद्यापीठ आपल्या उच्च शिखरावर पोहचले होते. नागार्जुन, आर्यदेव, असंग, वसुबंधू इत्यादी येथील प्रधान पंडीत होते.

नालंदा विद्यापीठ मुहमंद बख्तियार खिलजी ने केलेल्या आक्रमणामुळे विद्यापीठ पूर्णपणे तहस–नहस झालेले होते. इ.स. १२३५–३६ मध्ये नालंदा विद्यापीठात येणारे तिब्बती यात्री धर्मस्वामी यांनी नालंदा विद्यापीठाच्या दुलर्भ स्थितीचे वर्णन केलेले आहे.त्यांच्यानुसार जास्तीत जास्त इमारती नष्ट झाल्या होत्या.आणि केवळ प्रधान पंडीत राहूलश्रीभद्र आणि त्याचे ७० शिष्य राहीले होते. याप्रकारे नालंदा विद्यापीठाचे महत्व पूर्णपणे नाहीसे झाले होत.इथपर्यंत की नालंदा विद्यापीठाचे नाव सुद्धा विसरले होते. परंतु अलेक्झेण्डर कर्नींघमने पुन्हा या विद्यापीठाची ओळख करुन आधुनिक जगाच्या समोर प्राचीन जगातील महान विश्वविद्यालय आहे. हे स्थापित केले.

सर्वप्रथम नालंदा विद्यापीठाच्या अवशेषावर (खण्डर) बुछनॉन हॅमीलटन (Buchanon Hamilton) याची नजर पडली. जेव्हा की ते इ.स.१८११–१२ मध्ये येथे आले होते. परंतु या विद्यापीठाची वास्तविक ओळख जवळपास ५० वर्षांनंतर अलेक्झण्डर कर्नीघम यांच्या द्वारे झाली.त्याने चिनी यात्री यांच्या वर्णनावरुन आणि प्राप्त अभिलेखाच्या आधारे या विद्यापीठाची ओळख करुन दिली.

सन १९१५ मध्ये भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागानी नालंदाच्या उत्खनन कार्याला सुरुवात केली. आणि भारतातील हे सर्वात पहिले विश्वविद्यालय आहे असे संपूर्ण जगाला दाखविले. आणि भारतातील ज्ञानाची प्राचीन परंपरा असलेल्या महान केंद्राची प्रतिष्ठा पुन्हा स्थापित केली.

नालंदा विद्यापीठ केवळ ज्ञानाचेच नाही तर अन्य कलांचे सुद्धा केंद्र होते. आजच्या युगातील नालंदा विद्यापीठाचे प्राचीन वैभवाला जीवंत ठेवण्यासाठी इथे "नव–नालंदा महाविहाराची' सन् १९५१ मध्ये स्थापना केलेली आहे. या महाविहाराची स्थापना महान विद्वान व भिक्खू जगदीश काश्यप यांनी केली. त्यांनी नालंदा विद्यापीठाचे प्राचीन काळातील वैभव (महत्व) परत आणण्याकरिता जीवनाचा शेवटच्या क्षणापर्यंत कार्य केले.प्राचीन काळासारखे आज सुद्धा नालंदामध्ये थाईलंड,बर्मा,श्रीलंका, जपान इत्यादी देशातून भिक्खू व प्राप्ती करतात. उपासक येऊन भेट देऊन प्राचीन विश्वविद्यालयाला जीवंत करून ज्ञानाची प्राप्ती करतात.

प्राचीन पुराव्यानुसार नालंदाची प्राचीनता मौर्यकाळातील अशोकाच्या साम्राज्यापर्यंत जाते, तथापी या स्थळाची भरभराट इ.स. सनाच्या पाचव्या सहाव्या शतकापासून पुढे झाली, आणि हर्षवर्धन व पाल राजे (आठवे ते बारावे शतक) यांचा उदार आश्रय येथील विद्यापीठास मिळाला. कॅनिंगॅहम यांनी या स्थळाचा शोध १८७१ मध्ये लावला; पण प्रत्यक्ष उत्खनन मात्र १९५६ पासून पुढे कित्येक वर्षे करण्यात आले. यात अनेक मंदिरे, विहार, स्तूप, मुद्रा व ब्राँझच्या मुर्ती सापडल्या. अनेक पायऱ्या असलेली उत्तुंग विहारे, मध्ये चौक व भोवताली व्हरांडा आणि अनेक खोल्या असलेले अनेक विहार आणि सभागृहे आढळली. यावरुन प्राचीन विद्यापीठीय जीवनाची कल्पना येते, या इमारतीचे स्तंभ आणि भिंती कलात्मक चित्रांनी व कोरीव कामाने सजविलेल्या होत्या. विद्यार्थ्यांचे जीवन कसे होते. यावर प्रकाश टाकणारा पुरावाही येथे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाला आहे. विहार अनेक आगीच्या भक्षस्थानी पडल्याचा पुरावाही मिळतो. सुमात्रांच्या राजाच्या विनंतीवरुन देवपाल राजाने विहारांना गावे इनाम ग्रंथाचा दिल्याचा ताम्रपट सापडला आहे. नालंदा विहाराच्या तसेच खाजगी व श्रेणीच्या मुद्राही बऱ्याच मिळाल्या आहेत. अनेक स्तुपात मठ व धार्मिक मजकूर असलेल्या मृण्मुद्राही हाती आल्या आहेत.

नालंदा विद्यापीठ प्राचीन भारतातील एक आदर्श विद्यापीठ, बिहार राज्यातील राजगिरच्या उत्तरेस ११–२७ कि.मी. अंतरावर हे विद्यापीठ होते. त्याची स्थापना इ.स. पाचव्या शतकाच्या सुरुवातीस झाली असावी. याचे श्रेय बौद्ध आचार्य नागार्जुन यांचा शिष्य आर्यदेव यास देतात. उत्खननात सापडलेल्या मुद्रेवर "श्री नालंदा महाविहार–आर्य भिक्खू संघस्य" असे लिहलेले आहे व तिच्या दोन्ही बाजूंवर सारनाथचे धर्मचक्र आहे. येथे राहणाऱ्यांना निवास, भोजन, कपडालत्ता, औषधोपचार व शिक्षण विनामुल्य असे. हा सर्व खर्च दान दिलेल्या १०० खेड्यांच्या उत्पन्नातून व इतर देणग्यांतून चालत असे.

चारित्र्यसंपन्न व बुद्धिवान शिक्षक, अभ्यासू व होतकरू विद्यार्थी, कुशल प्रशासन, राज्यकर्त्यांचा सतत लाभलेला आश्रय यामुळे नालंदा विद्यापीठाची उत्तरोत्तर सतत आठ शतके भरभराट होत गेली. भारतातील अध्ययन अध्यापनाच्या श्रेष्ठ परंपरेला सातत्य व समृद्धी मिळवून देण्यात या विद्यापीठाचा वाटा फार मोठा आहे.

ह्यू–एन–त्संगने संघरामाच्या संदर्भात फार मोठ्या प्रसन्नतेने वर्णन केलेले आहे. त्याने आपल्या प्रवास वर्णनात म्हटले आहे की, पद्धतशीर बांधलेले उंच उंच मनोरे, अनेक मडंळ व प्रासाद व ज्यांची शिखरे जणू अभ्रमंडळ भेदून वर गेली आहेत, अशा प्रकारचे विहारे सर्वात मोठे सुंदर दिसत असते. या विहाराभोवती एक निलवर्ण जलप्रवाह वाहत असून त्याची शोभा त्यातील नीलोत्पलांनी अधिकच वृद्धीगंत केली होती. तसेच विहारामध्ये तेजस्वी सुवर्ण–पुष्पांच्या भारांनी वाकलेले कर्णिकार वृक्ष होते. तर बाहेर आम्रवृक्षवाटिकांच्या घनदाट छायेने भिक्खूची निवास्थाने आच्छादली होती. संघारामात आठ मोठ मोठे भव्य चौक होते. तसेच निरनिराळ्या चौकात भिक्खूनी राहण्यासाठी बांधलेल्या अनेक अशा चार मंजिली इमारती होत्या. संघारामात राहणाऱ्या व बाहेरुन येणाऱ्या भिक्खूची संख्या नेहमी १०,००० पर्यंत असे, आणि हे सर्व भिक्खू महायानी पंथांचे आहेत. अठरा पंथांचे अनुयायी एकत्रीत झाले होते. संघारामात वैद्यकीय ग्रंथ गृहशास्त्र आणि गणित शास्त्र इ. येथे अनेक विषयांचा अभ्यास होतो. संघारामात १०० व्यासपीठे असून शिष्य आपल्या गुरुंच पाठ प्रवचने मोठ्या निष्ठेने श्रवण करीत असतात. ह्यू–एन–त्संगच्या प्रवास वर्णनावरुन नालंदा विद्यापीठात सहा संघाराम होते, त्यापैकी एक पडलेला होता. आणि पाच चांगल्या स्थितीमध्ये विद्यमान होते. यापैकी एक मगधचा राजा महेद्रादित्य कुमारगुप्त यांनी बांधला होता. तसेच त्यामध्ये एक विहार ही बांधले होते. येथे चाळीस श्रमणांना दररोज भोजन दिले जात असत. महेंन्द्रादित्य कुमारगुप्त नंतर त्यांचा पुत्र बुद्धगुप्त सिंहासनावर आरुढ झाला आणि त्यानेही आपल्या पित्याने बांधलेल्या संघारामाच्या दक्षिण दिशेला दुसरा संघाराम बांधला. त्यानंतर बुद्धगुप्तचा मुलगा तथागत गुप्त यांने तिसरा संघाराम पूर्वेस बांधला यांनतर नरसिंहगुप्त (बालदित्य) गादीवर बसला आणि त्यांने उत्तर–पूर्व दिशेला चवथा संघाराम बांधला.

बालदित्यांनी चवथा संघाराम बांधल्यानंतर त्याने फार मोठा समारंभ घेतला आणि त्या समारंभाकरीता अनेक दूर–दूरच्या भिक्खूना आमंत्रित केले तसेच दोन चिनी भिक्खू सुद्धा समारंभात भाग घेण्यासाठी आले होते. यानंतर बालदित्य यांने चिवर परीधान केले होते. बालदित्य श्रामणेर झाल्यानंतर त्यांचा पुत्र वज्रादित्य सिंहासनावर आरुढ झाल्यानंतर त्यांनी पश्चिम दिशेला आणि महेन्द्रादित्य कुमार गुप्तने बांधलेल्या उत्तरेला पाचवा संघाराम वज्रादित्यानी बांधला आणि शेवटचा संघाराम महेन्द्रादित्य कुमार गुप्तने बांधलेल्या संघारामाच्या पश्चिमेला दक्षिणच्या एका राजाने सहावा संघाराम बांधला. असे एकूण सहा संघाराम नालंदा विद्यापीठात होते . तसेच विद्यापीठात ८० सभागृहे होती आणि सर्व विद्यापीठ परिसराला प्रांगण भिंत होती आणि संघारामाच्या केंद्रस्थानी विद्यापीठ होते. ह्यू–एन–त्संगच्या प्रवासवर्णावरून संघाराम आणि संघाच्या आसपास अनेक पवित्र स्थळे होती.

एक अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे इत्सिंग हा चिनी प्रवासी सातव्या शतकात भारतात आले होते. तेव्हा त्यांने सुद्धा बौद्ध धम्माचे शिक्षण या नालंदा विद्यापीठातूनच घेतलेले होते. इत्सिंगच्या सोबतच्या सहपाठीया मध्ये शांतरक्षित यांच्यासारखे विद्वान होते, इत्सिंगने 'रत्नोदधि' ग्रंथ संग्रहालयातून ४०० संस्कृत ग्रंथाचा चिनी भाषेत अनुवाद करुन ते आपल्या देशात गेले. त्याच प्रकारे गौरवाची गोष्ट म्हणजे नालंदा विद्यापीठातील अनेक महस्तलिखित ग्रंथफ केंब्रिज व लंडनच्या ग्रंथ संग्रहालयात प्राप्त झाले आहेत.

नालंदा विद्यापीठात अध्ययन करण्यासाठी येणारे विद्यार्थी तीन प्रकारात मोडले जात होते. त्यात पहिला भिक्खू भिक्खूना बौद्ध धर्मग्रंथाचा व तत्वज्ञानाचा अभ्यास करावा लागत असे. दुसऱ्या प्रकारचे विद्यार्थी ब्रह्मचारी ब्रह्मचारी विद्यार्थ्यांना सर्व परित्याग करुन ते धार्मिक व ऐहीक वाययांचा अभ्यास करू शकत होते. तिसऱ्या प्रकारचे विद्यार्थी हे मानवक असत, मानवक यांना बौद्ध धर्म ग्रंथांचे शिक्षण दिले जात होते. परंतु मिक्षू होण्याकरीता त्यांच्यावर सक्ती होत नव्हती ब्रह्मचारी व मानवक या दोन्ही प्रकारातील विद्यार्थ्यांना मात्र विहारात राहण्याची परवानगी होती, परंतु खर्च मात्र स्वतः करावा लागत असे तसेच विहारात शिस्त न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षाही होत असे आणि विहारातील विद्यार्थ्यांना विद्वानांच्या सभातून आपले ज्ञान, तसेच आविष्कारशक्ती सिद्ध करून दाखवावी लागत असे.

इत्सिंग आपल्या प्रवासवर्णनात म्हणतात की, "वादविवाद अथवा शास्त्रार्थ ही नालंदातील प्रमुख शिक्षण पद्धती होती".ह्यू–एन–त्संग जेव्हा नालंदा विद्यापीठात गेले तेव्हा नालंदाच्या लोकांनी ह्यू–एन–त्संगचे मोठ्या आदराने स्वागत केले होते. ह्यू–एन–त्संग यांच्या स्वागताचे वर्णन असे की, २०० भिक्खू व एक हजार बौद्ध धमीय लोक (जनता) हातात पताका, आतपत्रे, सुगंधी द्रव्ये व फुले इ. घेवून मिरवणुकीने त्यांचे स्वागत करण्यासाठी सारी जनता नगराबाहेर आली होती. जेव्हा ही मिरवणुक नगर द्वारपाशी पोहचली तेव्हा मठातील अखिल भिक्खूगण त्यात सामील झाले. अभिवादन समारंभ संपल्यानंतर अधिपतीच्या व्यासपीठावर एक खास आसन ठेवण्यात आले होते व त्यावर बसविण्या संदर्भात धर्मनायकाला विनंती करण्यात आली. यानंतर सर्व भिक्खू व सामान्यलोक आपापल्या ठिकाणी असल्यावर, ह्यू–एन–त्संग यांनी मठात वास करावा व मठातील भिक्खूची सर्व भांडी व सामान यांचा उपयोग करावा आणि त्याला उपाध्याक्षाने घंटानाद करुन जाहीर विनंती करावी, असे सांगण्यात आले, स्वागत समारंभ संपल्यानंतर या विशाल विहाराचा अधिपती 'शिलभद्र यांना धर्मनिधी' या नांवानेही संबोधित होते. ह्यू–एन–गंगचा मार्गदर्शक त्याला जेथे शिलभद्र बसले होते तेथे घेऊन गेले. शिलभद्राच्या समोर येताच ज्याप्रमाणे शिष्य गरुला अभिवादन करतात त्याचप्रमाणे ह्यू–एन–त्संगने त्यांना (शिलभद्राला) अभिवादन करुन त्यांचा सत्कार केला. ह्यू–एन–त्संगला शिलभद्राने त्यांच्या प्रवासाबद्दल व प्रकृतीबद्दल कुशल प्रश्न विचाराल्यानंतर शिलभद्राने ह्यू–एन–त्संग आणि त्यांचा बरोबरच्या भिक्खूकरिता आसने मागविली व त्यावर आसनस्थ होण्याकरीता त्यांना विनंती केली. मंडळी आसनस्थ झाल्यावर भारतात येण्याचे ह्यू–एन–त्संगचे काय उद्देश आहे ? या बद्दल पृच्छा केली. ह्यू–एन– त्संगने उत्तर दिले की "मी चीनहून विज्ञानवादाचा अभ्यास करण्यासाठी येथे आलो आहे." ह्यू–एन–त्संगच्या मुखातून या प्रकारचे उत्तर बाहेर पडताच शिलभद्राच्या डोळ्यातून अश्रुचा प्रवाह सुरू झाला. ह्यू–एन–त्संगच्या आगमनाबद्दल शिलभद्र यांना पूर्वबोध झाला होता. ह्याचे सविस्तर वर्णन करण्याकरीता शिलभद्रांनी भिक्खूना आज्ञा केली. ह्यू–एन–त्संगाने शिलभद्राच्या पूर्वबोधाचे भिक्षूंकडून वर्णन ऐकल्यानंतर ते म्हणाले की, ज्याअर्थी माझे आगमन आपल्या स्वप्नाप्रमाणे झाले आहे. त्याअर्थी हे कृपानिधे, मला धर्म विद्या देवून ज्ञानमृत पाजा व स्वामीनिष्ठ नम्र सेवकाप्रमाणे आपली मनोभावे सेवा करण्याची संधी द्या. वरिल सर्व चर्चा संपल्यानंतर ह्यू–एन–त्संगची बालदित्य राज्याच्या विहारात बुद्धभद्राबरोबर राहण्याची व्यवस्था करण्यात आली. ज्या विहारा ह्यू–एन– त्संगची राहण्याची व्यवस्था केली ते विहार चार मजली होते. या विहारात सात दिवस राहील्यानंतर ह्यू–एन–त्संग बोधीसत्व धर्मपालांच्या एन–त्संगने नालंदाचे शेजारी राहावयास गेले.

ह्यू–एन– त्संगने नालंदाचे कुलपती शिलभद्र यांचे जवळ शिक्षण घेण्याची जिज्ञासा प्रकट केली तेव्हा, शिलभद्राने ह्यू–एन–त्संगला प्रथम "सुर जयसेन" या एका क्षत्रिय विद्वानाकडे 'योगदर्शन' आणि 'न्यायदर्शन' या शिक्षणाकरीता पाठविले. सुरथ जयसेन हा दर्शन व शब्द शास्त्राचा महान विद्वान होता. जयसेनने बोधीसत्व स्थिरमती यांच्याकडून शब्द विद्येचे शिक्षण घेतले होते. सुरथ जयसेन यांनी अनेक महान पंडीताकडून अध्ययन समाप्त केल्यानंतर त्यांनी नालंदा विद्यापीठात प्रवेश केला होता. आणि महान विद्वान कुलपती शिलभद्र यांचे कडून बौद्ध ग्रंथाचे अध्ययन केले होते. जेव्हा ह्यू–एन– त्संग आपल्या गुरूसोबत बुद्धगयाचे महाबोधी विहाराचा उत्सव पाहण्याकरीता गेले होते, तेव्हा त्यांनी तेथे भगवान बुद्धाच्या पवित्र धांतूना सूर्य प्रकाशाप्रमाणे तेजस्वी स्वरूप्रात पाहिले होते.

**संदर्भ: प्राचीन भारतातील प्रमुख बौद्ध विद्यापीठे**
**डॉ.माणिक गजभिये**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# शेतकऱ्यांच्या दर्जेदार उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणार-पंकज रहांगडाले

**गोंदिया:** महिला बचतगटांनी तयार केलेल्या वस्तू गुणवत्तापूर्वक व दर्जेदार असतात. त्यामुळे स्वयंसहायता महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना तसेच शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करुन देणार. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले.

कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन (आत्मा) व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मोदी मैदान, बाला-घाट रोड, गोंदिया येथे आयोजित जिल्हास्तरीय कृषी महोत्सवाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे हे होते. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण, विभागीय सनियंत्रण व मुल्यमापन अधिकारी (माविम) नागपूर राजु इंगळे, जिल्हा माहिती अधिकारी रवि गिते, जिल्हा माहिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनीकर, महिला आर्थिक विकास महामडळाचे (माविम) जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर, कृषी विज्ञान केंद्र हिवरा चे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.सैय्यद अली, कृषी उपसंचालक प्रणाली चव्हाण, तंत्र अधिकारी कावेरी साळे, पं.स.सभापती मुनेश्वर रहांगडाले यांचेसह सर्व जि.प.सदस्य व सर्व पं.स.सदस्य मंचावर उपस्थित होते.

कृषी विभाग व महिला आर्थिक विकास महामंडळाद्वारे कृषी महोत्सवाच्या माध्यमातून एक उत्कृष्ट कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी जे विकेल ते पिकेल अशा पिकाचे उत्पादन घ्यावे. महिला आता आत्मनिर्भर झालेल्या आहेत. महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना विक्री करण्यासाठी पंचायत समितीमध्ये २ दुकाने उपलब्ध करुन देण्यात यावे असे त्यांनी सांगितले.

गोंदिया जिल्ह्यातील शेतकरी हा धानाची शेती करीत असला तरी स्ट्रॉबेरी सारखे नवनविन उत्पादन घेत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाद्वारे सेंद्रीय गुळाची निर्मीती करण्यात आली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी प्रयोगशील शेती करावी. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी जिल्हास्तरावर, राज्यस्तरावर व आंतरराष्ट्रीय स्तरावर शेतकऱ्यांच्या उत्पादनाला नेहमीच सहकार्य राहील असे सांगून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नाविण्यपूर्ण प्रकल्प उभारावे जेणेकरुन प्रशासकीय मदत करण्यास सोईचे होईल. या कृषी महोत्सवाचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पुरेपूर लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले.



जिल्ह्यातील अनेक प्रगतीशील शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात व सामाजिक कार्यकर्त्यांनी सामाजिक क्षेत्रात जिल्ह्याची ओळख निर्माण केली आहे. जिल्ह्याचे मुख्य पीक हे तांदूळ आहे. भविष्यात अनेक फलोत्पादन घेऊन जिल्ह्यात प्रगती घडून येईल असे मुनेश्वर रहांगडाले यांनी सांगितले.

महिला आर्थिक विकास महामंडळ राज्यात चांगले कार्य करीत आहे. राज्यात सव्वा लाख महिला बचत आहेत. महिला ह्या बँकेच्या कर्जाची प्रामाणिकपणे परतफेड करतात, त्यामुळे महिला बचतगट लिंकेजचे प्रमाण वाढले आहे. महिला बचतगटाने तयार केलेल्या वस्तुंना मार्केटींग मिळाली तर महिलांचा आर्थिकस्तर उंचावेल व त्या आत्मनिर्भर होतील. विकेल ते पिकेल असा शासनाचा मानस आहे. महिला बचतगटानी तयार केलेल्या वस्तु गुणवत्तापूर्वक असल्यामुळे या कृषी महोत्सवात सहभागी होऊन वस्तु विकत घ्यावे असे आवाहन राजु इंगळे यांनी केले.

यावर्षी २ हजार ५०० महिला बचतगटांना ८० कोटी रुपये कर्ज देण्यात आले. ३१० महिलांना ३ कोटी रुपये वैयक्तिक कर्ज दिले. संयुक्त दायित्व गट (यामध्ये प्रत्येक गटात ५ महिला असतात) यामधून ८ कोटी रुपये कर्ज देण्यात आले असे संजय संगेकर यांनी सांगितले.

या जिल्हास्तरीय कृषी महोत्सवामध्ये कृषी प्रदर्शनी, धान्य महोत्सव, उत्पादक ते थेट ग्राहक थेट विक्री, चर्चासत्र व परिसंवाद, पौष्टिक तृणधान्य महोत्सव, पौष्टिक तृणधान्य पाककला स्पर्धा, खाद्य महोत्सव, खरेदीदार विक्रेता संमेलन, सेंद्रीय शेतमाल विक्री, शेतकरी सन्मान समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध शासकीय योजनांवर मार्गदर्शन व चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे असे प्रास्ताविकातून हिंदुराव चव्हाण यांनी सांगितले.

यावेळी जयश्री पुंडकर, छाया मेश्राम, डॉ.मंगला कटरे, सविता तुरकर यांना मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ या पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, पंजाबराव देशमुख व वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन दीप प्रज्व-लीत करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या कृषी महोत्सवात महिला आर्थिक विकास महामंडळाचे ७० स्टॉल, कृषी विभाग व संलग्न ३० स्टॉल, कृषी यांत्रिकीकरण २० व इतर ३० स्टॉल, असे एकूण १५० स्टॉल्स लावलेले आहेत.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तालुका कृषी अधिकारी धनराज तुमडाम यांनी केले. उपस्थितांचे आभार माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर यांनी मानले. कार्यक्रमास शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिरसी प्रकल्पग्रस्तांची बोळवण सुरुच




**गोंदिया:-** तालुक्यातील बिरसी विमानतळासाठी २००७ साली जमिनीचे अधिग्रहण करण्यात आले. मात्र आजही बिरसीतील १०६ कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले नाही. प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनानंतर या कुटुंबांना भूखंड देण्यात आले. परंतु, रजिस्ट्री झाली नाही. रस्ते, नाल्या व इतर नागरी सुविधा नाहीत. वाढीव मोबदलाही प्रलंबित आहे. बिरसी प्रकल्पग्रस्तांची बोळवण सुरूच आहे. पीडित प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या न्याय हक्कासाठी पुन्हा आंदोलनाचा पावित्रा घेतला आहे.

बिरसी येथे स्वातंत्र्यपूर्व काळातील विमानतळ होते. विमनतळाचाच वापर इंग्रज करत होते. स्वातंत्र्यानंतर या विमानतळाकडे दुर्लक्ष झाले. धावपट्टी तेवढी शिल्लक राहिली. तत्कालीन केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री प्रफुल्ल पटेल यांनी या विमानतळाचा कायापालट करण्याचा चंग बांधला. विमानतळाचा विस्तार, वैमानिक प्रशिक्षण केंद्र तयार झाले. विस्तीर्ण जागेत हे विमानतळ आहे. यासाठी सन २००७ मध्ये बिरसी आणि परिसरातील १०६ कुटुंबियांची जागा विमानतळ प्राधिकरणाने अधिग्रहित केली. त्यांचे पुनर्वसन सन २०१४ पूर्वी होणे अपेक्षित होते. मात्र शासन, प्रशासनाच्या वेळकाढू धोरणामुळे अद्यापही त्यांचे पुनर्वसन झाले नाही. दशकभरापासून पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित आहे. पुनर्वसनाकरिता येथील कुटुंबियांनी अनेकदा जिल्हा प्रशासन व विमानतळ प्राधिकरणाकडे निवेदने दिली, आंदोलने केली. मात्र याकडे दुर्लक्षच झाले. गतवर्षी प्रकल्पग्रस्तांनी विमानतळ प्राधिकरणाच्या मोकळ्या आजागेवरच अतिक्रमण केले होते. यानंतर प्रशासन खळबळून जागे झाले. यानंतर प्रत्येक कुटुंबाला ५ लाख रुपये व भूखंड देण्यात आले. या भूखंडांची रजिस्ट्री झाली नाही. वाढीव मोबदला देण्यात आला नाही, ज्या ठिकाणी पुनर्वसन करण्यात येणार आहे त्याठिकाणी रस्ते, नाल्या, वीज, पाणी आदी नागरी सोयी नाहीत. या मागण्यांना घेऊन पुन्हा संघर्ष समितीने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

## लोकशाही दिनाचे आयोजन ३ एप्रिल रोजी

**गोंदिया :** जिल्हयामध्ये सर्व सामान्य जनतेसाठी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. येत्या ३ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

लोकशाही दिनानिमित्ताने जिल्हाधिकारी यांचेकडून जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील आणि शासनाच्या विविध विभागाचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी यांना त्या संबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील. जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाही दिनानिमित्य या कार्यक्रमात ज्या नागरीकांनी १५ दिवसापूवी अर्ज सादर केलेले आहेत, त्यांनीच लोकशाही दिनात उपस्थित राहून आपल्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी सादर करावीत. याबाबत सर्व जनतेनी नोंद घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे यांनी केले आहे

## कृषी विभागात उत्कृष्ठ काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार

**गोंदिया:** कृषी विभागाच्या शेतकरी कल्याणाच्या विविध योजना उत्कृष्टपणे राबविणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे व मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन कृषी महोत्सवात सत्कार करण्यात आला. महिला व बाल विकास विभागाअंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने २३ मार्च ते २७ मार्च दरम्यान गोंदिया जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात हा सत्कार करण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शीतल पुंड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण व माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर उपस्थित होते.

सत्कार करण्यात आलेल्यात नोडल अधिकारी (स्मार्ट) प्रणाली चव्हाण, पुरवठा व मूल्यांकन साखळी तज्ञ कावेरी साळे, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) सुषमा शिवणकर, अर्थ सल्लागार (स्मार्ट) सचिन कुंभार, कृषी अधिकारी पवन मेश्राम, सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा अरविंद उपवंशी, लेखापाल विशाल बडमेरा, पवन भोसले, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा सुनील खडसे, विलास कोहडे, शिवकुमार पुस्तोडे, यासिन नजीर शेख, सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक गजानन पटले, शैलेश बिसेन, गुलचंद मस्के, घनश्याम चव्हाण, जिल्हा सल्लागार भारत गोंडाणे, नूतन कटरे, भावेश दमाये, रिजवान शेख, पुस्तकला खैरे, कुंजलता भुरकुडे, कामेश भो-रणारे, संजय ठाकरे, मुनेश्वर कोसमे, रमेश कोराम, भौदीप शहारे, ओकेश न्हाने, रजत शेंडे, वर्षा हाडगे, दीपक डहाळे, पी.व्ही. कलेवार, जे.टी. मेंढे, एल.एम. रिनाईत, एस.व्ही. दांडगे, नमिता यादव, राधेश्याम लोहबरे, प्रमोद खोटेले, भारत डोंगरवार, राहुल हिवाळे, दीपा पारधी व व्ही.एस. बिसेन यांचा समावेश आहे.

## कृषी महोत्सवात जिल्हाधिकाऱ्यांचा नेत्रदानाचा संकल्प अर्ज भरुन केली सुरुवात



**गोंदिया :** सर्व श्रेष्ठ दान हे रक्तदान व नेत्रदान असे आपण नेहमीच म्हणतो. रक्तदान आपल्यापैकी बरेच नागरिक प्रसंगी करत असतात. मात्र नेत्रदानाचा संकल्प खूप कमी लोक करतात. कृषी महोत्सवात आज जिल्ह्याचे प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी अर्ज भरुन नेत्रदानाचा संकल्प केला.

केटीएस सामान्य रुग्णालयाच्या वतीने कृषी महोत्सवात नेत्रदान जनजागृती स्टॉल लावण्यात आला होता. या स्टॉलवरील डॉक्टर नागरिकांना नेत्रदानाचे महत्व समजावून सांगत होते. आपल्या मरणोप्रांत नेत्रदानामुळे आपण नस-लो तरी इतरांच्या माध्यमातून जग पाहू शकतो. "जिते जिते रक्तदान, जाते जाते नेत्रदान, और जाने के बाद नेत्रदान-देहदान" हा मूलमंत्र डॉक्टर लोकांना सांगत होते. या स्टॉलला जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले व जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी भेट दिली. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वयंस्फूतीने नेत्रदानाचा अर्ज भरून आ-पला नेत्रदानाचा संकल्प केला. हा संकल्प इतरांसाठी आदर्श असाच आहे. रक्तदान करा, नेत्रदान करा, देहदान करा हा सल्ला इतरांना देतांना त्याची सुरुवात आपल्यापासून करण्याला खूप महत्व असते. जिल्हाधिकाऱ्यांनी ही सुरुवात स्वतःपासून करुन समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या कृतीचे उपस्थितांनी कौतुक केले.

एक वर्ष वयापासून कुठलीही व्यक्ती मरणोत्तर नेत्रदान करू शकते. अन्नातून विषबाधा झालेली व्यक्ती, गंभीर आजार असलेली व्यक्ती नेत्रदान करू शकत नाही. नेत्रदानाची प्रक्रिया सुलभ असून नेत्र काढण्याची प्रक्रिया केवळ पंधरा ते वीस मिनिटात पूर्ण केली जाते. चष्मा असलेली व्यक्ती, मधुमेह झालेली व्यक्ती किंवा मानसिक आजार असलेली व्यक्ती नेत्रदान करू शकते. ज्यांना मरणोत्तर नेत्रदान करण्याची इच्छा असेल त्यांनी राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कक्ष केटीएस सामान्य रुग्णालय गोंदिया येथे संपर्क करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे.

# शासनाने संपविल्या शासकीय नोकऱ्या-परशुरामकर



**अर्जुनी मोरगाव:** राज्यात बेरोजगार युवकांची संख्या वाढत आहे. बेरोजगार युवक शासकीय नोकरीसाठी धडपड करत आहेत. परिचर पद कंत्राटी असे चित्र राज्याच्या शासकीय सेवेत कधीच बघितले नाही. मात्र, आता चक्क चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांपासून तर क्लास टू ऑफिसरही कंत्राटी असणार आहेत. उद्या क्लास वन व सुपर क्लास वन दर्जाचे अधिकारीही कंत्राटी असले तर नवल वाटायला नको, असा आर-ोप राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर यांनी केला आहे.

राज्य शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार मंत्रालयाने १४ मार्च रोजी परिपत्रक निर्गमित केले. यात ब्राह्ययंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी सेवा पुरवठादार, संस्थेचे एजन्सीचे पॅनल नियुक्ती करण्यासाठी शासन मान्यता दिली. यानुसार अतिकुशल, कुशल, अर्धकुशल व अकुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याच्या निविदा मागविण्यात आल्या. यात ९ पुरवठादारांना मनुष्यबळ पुरवठा करण्याचे काम देण्यात आले. हे पुरवठादार आता मनुष्यबळ उपलब्ध करुन देणार असल्याने होतकरु सुशिक्षीत बेरोजगार युवकांचे शासकीय नोकरीचे स्वप्न भंगले आहे. कंत्राटी स्वरूपाच्या नोकरी शासक स्वत: देणार नसल्याने पुरवठादारांची मनमानी चालण्याची शक्यता नाकारता येत नाही. शासनाने ठरवून दिलेला मेहनताना न देणे, नफेखोरी करणे, मनुष्यबळ भरतीसाठी पैशाची मोगणी करणे, पात्र उमेदवारांची वर्णी न लागणे, कामे करुन घेत असताना छळ करणे यासारखे प्रकार घडू शकतात. असा आरोप गंगाधर परशुरामकर यांनी केला आहे. या पद्धतीने पदभरती न करता शासनाने आपल्या स्तरावर नोकरभरती करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# केमिकलमध्ये नोटा तयार होण्याचे कारण सांगून फसवणूक करणाऱ्या ५ आरोपींना अटक

**गोंदिया :** केमिकलमध्ये १० हजार रुपयांच्या नोटा ठेवल्यास अडीच लाख रुपये तयार होतात असे सांगून १० हजार रूपयाने फसविणाऱ्या पाच आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्या आरोपींना २४ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता बालाघाट टी पॉइंट येथे अटक करण्यात आली. पिंटूकुमार सुंदरलाल बारमाटे (३२) रा.ए-४६,मलाजखंड वॉर्ड क्रमांक २०, जि.बालाघाट,दुर्गेश सिताराम मरसकोल्हे (३०) रा.बंजारीटोला, ता.बिरज, जि.बालाघाट, सियाराम महिपाल चौधरी (४२) रा. सतोना,ता.जि.गोंदिया, राजेश अमरलाल नेवारे(३०) रा. बालाघाट,विष्णू बाबुलाल पंधरे(४२) रा.पारगाव, ता. किरनापूर जि.बालाघाट अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. सतोना येथील दिपांशू



ब्रिकचंद उरकुडे यांना आरोपींनी १० हजार रुपयाच्या नोटा एका केमिकलमध्ये ठेवल्यास काही तासात त्या नोटा मधून अडीच लाख रुपये तयार होतात असे सांगून त्यांच्या कडून १० हजार रुपये घेतले.

एक केमिकल टाकलेले नोटाचे बंडल पॅक करुन दिपांशू यांना दिले. दोन तासांनी उघडून बघायला सांगितले. उरकुडे यांनी याच्या जवळून १० हजार रुपये जप्त करण्यात आले. या आरोपींवर रावणवाडी पोलिसांनी भादंविच्या कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक विजय शिंदे, सरवदे, महिला पोलीस उपनिरीक्षक वनिता सायकर, सहाय्यक फौजदार अर्जुन कावळे, पोलीस हवालदार चित्तरंजन कोडापे, इंद्रजित बिसेन, पोलीस शिपाई संतोष केदार, महिला पोलीस शिपाई स्मिता तोंडरे यांनी केली आहे. उरकुडे यांची फसवणूक करण्यासाठी आलेल्या आरोपींनी या कृत्यासाठी जी कार वापरली त्या कारचा क्रमांक सीजी १२ एआर ७१९४ होता. ती कार गोंदियाच्या दिशेने गेल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बालाघाट टी पॉईट,गोंदिया येथे सापळा रचून नाकाबंदी केली. २४ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता रावणवाडी कडून गोंदिया कडे येणाऱ्या त्या कारला थांबवून तपासणी केली असता त्या चारचाकी कारमध्ये ५ संशयित व्यक्ती दिसले.त्यांची कसून चौकशी केल्यावर गुन्ह्याची कबुली दिली .


## ग्रामपंचायत कार्यालय कोरंभीटोला
### तालुका अर्जुनी /मोर,जिल्हा गोंदिया
### निविदा सूचना क्र.३/२०२२-२३(पहिली वेळ)

ग्रा.पं. कोरंभीटोलाता.अर्जुनी/मोर. जि. गोंदिया अंतर्गतसन २०२०-२१ या १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत बौध्द विहाराजवळ नविन हातपंपाचे काम करण्यासाठी ऑफलाईन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर निविदा केवळ ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असुन निवीदा बाबत इतर सविस्तर माहिती ग्रा.पं. कार्यालय कोरंभीटोलाचे सुचना फलकावर उपलब्ध आहे.

**निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी | दिनांक २९/०३/२०२३ पासून |
| २ | निविदा ऑफलाईन भरणा | दिनांक २९/०३/२०२३ ते ०६/०४/२०२३ सायं.५ वा.पर्यंत |
| ३ | निविदा उघडणे | ग्रा.प.मासिक सभेत शक्यता |
| ४ | निविदा भरणा पुर्व बैठक | नाही |

५) निविदा शुल्क व अनामत रक्कम भरणा करणे
ग्रामपंचायत कोरंभीटोला खाते क्र. ९७७९०१०००१६४५८ बँकेचे नाव - बँक ऑफ बडोदा अर्जुनी/मोर. बँकेचे IFSC Code क्र. BARB0DBARJN या खात्यावर RTGS/ NEFT / DirectTransfer किंवा ग्रामपंचायत कोरंभीटोला येथे रोखीने भरणा करणे.

ग्रामसेवक उपसरपंच सरपंच
ग्रामपंचायत कार्यालय कोरंभीटोला


# शास्त्री वॉर्डात आठवडाभरापासून दुषित पाणीपुरवठा

## मजिप्राचे दुर्लक्ष : पाईपलाईन फुटल्याची चर्चा

**गोंदिया :** शहरातील प्रभाग क्र.२०/२१ अंतर्गत येणाऱ्या शास्त्री वॉर्ड येथे मागील आठवडाभरापासून दुषित पाणी पुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांना पिण्याचे पाणी मिळणे कठीण झाले आहे. परिणामी शुध्द पाण्याच्या शोधार्थ नागरिकांची वणवण सुरू आहे.



पाईप लाईनचे काम सुरू असल्याने पाणी पुरवठा खंडीत झाला असावा, असा अंदाज होता. परंतु, या प्रकाराला ८ दिवस लोटूनही पाणी पुरवठ्यात सुधार झालेला नाही. याकडे मजिप्राचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये रोष व्यक्त केला जात आहे.

शहरात पाणी पुरवठ्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर आहे. शहरातील नागरिकांना सकाळ व सायंकाळी अशा प्रकारे दोन वेळा नळांच्या माध्यमातून पाणी पुरवठा केला जातो. परंतु, शास्त्री वॉर्ड येथे मागील आठ दिवसांपासून दुषित पाणी पुरवठा सुरूआहे. पाणी एवढे दुषित असल्याने वापरण्यायोग्यही नाही. परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी येथील नागरिकांची वणवण सुरू आहे. दुषित पाणी पुरवठा होत असूनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. पाईप लाईनचे काम सुरू असल्याने एखाद्या ठिकाणाहून गळती ला-गली असेल, यामुळे नळांना दुषित पाणी येत असावे, असा अंदाज नागरिक व्यक्त करीत होते. पण या बाबीला ८ ते १० दिवस लोटूनही शुध्द पाणी पुरवठा होत नसल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. याकडे महाराष्ट्र

### पाणी पुरवठा खंडीत...

**शास्त्री वॉर्डासह परिसरात दुषित पाणी पुरवठा होत आहे. ही समस्या कायम असताना पाणी पुरवठा योजनेतंर्गत होत असलेल्या पाणी पुरवठ्यात खंड पडला आहे. सकाळी एक ते दिड तास नळांना पाणी येत आहे. तर सायंकाळी पाणी पुरवठाच बंद राहत आहे. विशेष म्हणजे, परिसरातील अनेक भागात नळांच्या माध्यमातून दिवसभर पाणी पुरवठा होत असे. परंतु, मागील ८ दिवसांपासून यामध्ये विघ्न आले आहे.**

### बोरवेलही नांदुरुस्त

**परिसरात नळांना दिवसभर पाणी येत असल्याने नागरिकांची पाण्याची समस्या सुटली होती. पण मागील ८ दिवसांपासून दुषित पाणी पुरवठा होत आहे. नळांना येणारे पाणी वापरण्यायोग्य नाही. त्यामुळे नागरिक बोरवेलकडे वळले. पण बोरवेलही बंद पडून असल्याने नागरिकांच्या समस्येत अधिकच भर पडली आहे.**

जीवन प्राधिकरणने लक्ष केंद्रीत शुध्द पाणी पुरवठा करण्यासाठी उपाययोजना करावी, अशी मागणी शास्त्री वॉर्ड व परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.


## ग्रामपंचायत कार्यालय बोरगाव
### पंचायत समिती गोरेगाव
### ई-निविदा

निविदा क्रं.१ दिनांक:-२५/०३/२०२३
ग्रामपंचायत कार्यालय बोरगाव पंचायत समिती गोरेगाव हे १५ व्या वित्त आयोग अंतर्गत ग्रा.पं.बोरगाव येथे सिमेंट रस्ता बांधकाम जि.प.बांधकाम विभाग गोंदिया कडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध कंत्राटदाराकडून बोलविण्यात येत आहे. सदर ई-निविदा ची विस्तृत माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळ www.mahaternders.gov.in वर उपलब्ध असून विस्तृत माहिती ग्रा.पं.कार्यालयात उपलब्ध आहे.

**ई-निविदा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिद्धी व दाखल दिनांक | दिनांक २५/०३/२०२३ पासून |
| २ | ई-निविदा अंतिम दिनांक | दिनांक ३०/०३/२०२३ ला १२.०० वा.पर्यंत |
| ३ | ई-निविदा उघडण्याची दिनांक | दिनांक ३१/०३/२०२३ ला १२.०० वा.शक्य झाल्यास |

विस्तृत माहिती ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर बघायला मिळेल तसेच अटी व शर्ती सर्वांना लागू राहतील.

सरपंच — ग्रामपंचायत कार्यालय बोरगाव
ग्रामसेवक — ग्रामपंचायत कार्यालय बोरगाव

## ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी
### पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परिषद गोंदिया

निविदा सुचना-०३/२०२२-२३ दि.२४/०३/२०२३
ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परिषद गोंदिया हे अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्राचा विकास करणे योजने अंतर्गत ग्रा.पं.कुऱ्हाडी येथे आवर्भीत व सभामंडप बांधकाम करणे तसेच १५ वा वित्त आयोग अंतर्गत सिमेंट रस्ता व सिमेंट नाली बांधकाम करणे ई-निविदा जि.प.बांधकाम विभाग गोंदिया कडे तथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावारी पद्धतीने ऑनलाईन मागवित आहे. ई-निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahaternders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक २४/०३/२०२३ पासून उपलब्ध आहे.

**ई-निविदा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिद्धी व दाखल दिनांक | दिनांक २४/०३/२०२३ पासून |
| २ | ई-निविदा अंतिम दिनांक | दिनांक ३०/०३/२०२३ ला १२.०० वा.पर्यंत |
| ३ | ई-निविदा उघडण्याची दिनांक | दिनांक ३१/०३/२०२३ ला १२.०० वा.शक्य झाल्यास |

विस्तृत माहिती ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर बघायला मिळेल तसेच अटी व शर्ती सर्वांना लागू राहतील.

सरपंच — ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी
ग्रामसेवक — ग्रामपंचायत कार्यालय कुऱ्हाडी

## ग्रामपंचायत कार्यालय धाबेटेकडी/आदर्श
### पंचायत समिती अर्जुनी/मोर. जि.प.गोंदिया
### जाहिर निविदा सुचना (पहिली वेळ)

ह्या सुचने द्वारे सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येते कि मासिक सभा ठराव क्रमांक ८/३ दिनांक १३/०७/२०२२ अन्वये ग्रामपंचायत धाबेटेकडी/आ.येथे **१५ व्या वित्त आयोग** अंतर्गत प्रस्तावित धाबेटेकडी/आ. येथे **१) गावातील लोकांसाठी शुद्ध पाणी पुरवठा करणे टाकीची रंगरंगोटी करणे व दुरुस्ती करणे** चे कामे करण्याकरीता मोहरबंद दोन लिफाफा पद्धतीने ब-१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक २९/०३/२०२३ ते दि.०४/०४/२०२३ पर्यंत विक्री करिता उपलब्ध आहेत. नमूद केल्या प्रमाणे अटी व शर्ती च्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी. इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्तावेज व दरपत्रके अटी व शर्ती प्रमाणे ह्या नोटीस च्या दिनांकापासून ग्रा.पं.कार्यालयात दिनांक ०४/०४/२०२३ ला दुपारी ठीक ०३.०० वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

काही अडचण असल्यास ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.

सदर निविदा हि दिनांक ०५/०४/२०२३ ला (शक्य झाल्यास) सर्व संबंधितांसमोर उघडण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | कामाची अंदाजित किंमत | नमुना ७ निविदा फार्मची किंमत | निविदा सोबत भरावयाची अनामत रक्कम १% | निविदा स्विकृत झाल्यास सुरक्षा ठेव रक्कम २% | बिलातून कपात करण्यात येणारी सुरक्षा ठेव रक्कम २% | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाचे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **गावातील लोकांसाठी शुद्ध पाणी पुरवठा करणे टाकीची रंगरंगोटी करणे व दुरुस्ती करणे** | १००४१४/- | १०००/- | १००४/- | २००८/- | २००८/- | ३ महिने | योग्य त्या वर्गवारीत |

निविदेचा तपशील खालीप्रमाणे आहे.
अटी व शर्ती:- १) सदर बांधकाम निविदा करिता कोरे निविदा ची किंमत रू.१०००/- चे नमुना ७ पावती ग्रा.पं.कार्यालयातून कोटेसन फार्म सोबत घेऊन निविदा सादर करावी.
२)निविदा भरणाऱ्या कंत्राटदाराच्या अपलोड लिफाफा क्रमांक १ मध्ये अनामत रक्कमेचा धनाकर्ष व निविदा फीस असलेल्या नमुना ०७ ची पावती राहणे बंधनकारक आहे व अशाच कंत्राटदाराचा विचार केला जाईल. ३) कामाचे देयकातून शासन निर्णयानुसार योग्य कर (Income Tax,VAT,GST, २% टीडीएस,Royalty,Insurance etc.) कपात करण्यात येईल. काम पूर्ण झाल्यानंतर काम समाधानकारक असल्यास कपात केलेली सुरक्षा राशी (Defect Liability Prriod) संपल्यानंतर परत करण्यात येईल. ४) कामावरील मजुरांसोबत अनुचित घटना (अपघात,मृत्यृ) घडल्यास सर्वस्वी जवाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. ५)निविदेसंदर्भातील सर्व अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर बघावयास मिळतील. काही अडचणी असल्यास ग्रामपंचायत कार्यालयात संपर्क करावे.

ग्रामसेवक — ग्राम पंचायत कार्यालय धाबेटेकडी/आदर्श
सरपंच — ग्राम पंचायत कार्यालय धाबेटेकडी/आदर्श

